सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बांगलादेश पेटला! २८ पत्रकारांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न

### एका हिंदूला झाडाला उलटे टांगून जाळले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ढाका**

बांगलादेशात आरक्षणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या आंदोलनाने आता हिंसक वळण घेतले आहे. गुरुवारी संतप्त आंदोलकांनी ढाका येथील दोन नामांकित वृत्तपत्रांच्या कार्यालयांवर हल्ला करून इमारतीला आग लावली. या आगीच्या वेळी अनेक पत्रकार आणि कर्मचारी इमारतीत अडकले होते, ज्यांना अग्निशमन दलाने शिताफीने बाहेर काढले. तर जमावाने एका हिंदू व्यक्तीला मारहाण करत झाडाला टांगून जिवंत जाळल्याचा प्रकार समोर आला आहे.



ढाका येथील द डेली स्टारच्या कार्यालयावर आंदोलकांनी अचानक हल्ला केला. आंदोलकांनी इमारतीच्या बाहेरील वाहनांची जाळपोळ केली आणि त्यानंतर कार्यालयाला आग लावली. धुराचे लोट आणि वाढत्या आगीमुळे कार्यालयातील पत्रकारांमध्ये घबराट पसरली होती. काही पत्रकार इमारतीच्या छतावर अडकले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत शिडीच्या साहाय्याने अनेक पत्रकारांचे प्राण वाचवले.

हिंसाचार नियंत्रणात आणण्यासाठी बांगलादेश सरकारने देशातील मोबाईल इंटरनेट सेवा अनिश्चित काळासाठी बंद केली आहे. शाळा, महाविद्यालये आधीच बंद करण्यात आली असून, ढाकासह अनेक शहरांत लष्करी दले तैनात करण्यात आली आहेत. आंदोलकांचा म्होरक्या उस्मान हादी याला आठवड्याभरापूर्वी गोळ्या घालण्यात आल्या होत्या. त्याचा मृत्यू झाल्याने बांगलादेशमध्ये हिंसाचार सुरु झाला आहे.

## संसदेत कटुता विसरून रंगल्या गप्पा

### पंतप्रधान मोदी आणि प्रियांका गांधी, सुप्रिया सुळे यांच्यात चाय पे चर्चा...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर शुक्रवारी राजकीय वर्तुळातील सर्व मतभेद बाजूला ठेवून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे नेते एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. अधिवेशनाच्या समाप्तीनंतर परंपरेनुसार आयोजित करण्यात आलेल्या चहापानाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांच्यातील संवाद आकर्षणाचे केंद्र ठरला.



या चहापानावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू हे सर्व एकाच ठिकाणी बसले होते. संसदेच्या सभागृहात एकमेकांवर तुटून पडणारे हे नेते चहापानावेळी मात्र अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात गप्पा मारताना दिसले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू, केंद्रीय मंत्री चिराग पासवान, लल्लन सिंग, किरेन रिजिजू, अर्जुन राम मेघवाल, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) च्या खासदार सुप्रिया सुळे, समाजवादी पक्षाचे खासदार राजीव राय, धर्मेंद्र यादव आणि द्रमुकचे खासदार ए राजा यांच्यासह अनेक सभागृह नेते उपस्थित होते.

**राजकीय कटुता विसरून संवाद**

प्रियांका गांधी यांनी वायनाड पोटनिवडणुकीतून विजय मिळवून संसदेत प्रवेश केला आहे. खासदार म्हणून त्यांचे हे पहिलेच अधिवेशन होते. या चहापानादरम्यान पंतप्रधान मोदी आणि प्रियांका गांधी यांच्यात काही काळ संवाद झाला.

**अधिवेशनाचा समारोप**

यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले. संसदेचे हे हिवाळी अधिवेशन वादळी ठरले असले तरी, शेवटच्या दिवशी चहापानाच्या निमित्ताने का होईना, सर्व पक्षांचे नेते एका सुरात आणि हसतमुख चेहऱ्याने वावरताना दिसल्याने 'संसदीय शिष्टाचाराचा' नवा पायंडा पाहायला मिळाला.

## ...म्हणून आम्ही सांगत होतो करा सदैव हिंदुत्वाची कदर

### पवारांचा उल्लेख, आशिष शेलारांनी उद्धव ठाकरेंवर डागली तोफ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

बृहन्मुंबई महापालिका निवडणुकीमुळे मुंबईतील राजकारणाचा पारा चढू लागला आहे. काँग्रेसने स्वबळाचा नारा दिल्यामुळे आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबई फारशी ताकद नसल्याने मुंबईतील महायुतीतील भाजप-शिवसेना विरुद्ध शिवसेना-मनसे अशीच लढाई होणार, असेच चित्र आहे. भाजपकडूनही तसेच संकेत मिळत आहेत. कारण गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या नेत्यांनी ठाकरेंनाच घेरण्यास सुरूवात केली आहे. भाजपचे नेते आशिष शेलार यांनी एका काव्यातून ठाकरेंवर पुन्हा हिंदुत्व आणि रामाच्या मुद्द्यावरून तोफ डागली.




उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची राज ठाकरे यांच्या मनसेसोबत जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. काँग्रेसने स्वबळाचा नारा दिल्यामुळे ठाकरे काँग्रेससोबत जाण्याचा मुद्दा निकाली निघाला आहे. पण, शरद पवारांची राष्ट्रवादी काय भूमिका घेणार याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. अशातच शेलारांनी ठाकरेंना डिवचले आहे.

भाजप नेते शेलारांनी एका कवितेतून ठाकरेंवर प्रहार केला आहे. काँग्रेसने दूर केल्यामुळे ठाकरे आता शरद पवारांच्या दारात उभे आहेत. तर मनसेची मदत होईल अशी आशा त्यांना आहे, अशा आशयाची ही कविता आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी कायम राहावी यासाठी ठाकरेंची शिवसेना प्रयत्न करत आहे. एकीकडे मनसेसोबत जागावाटपाबद्दल चर्चा सुरू असताना आता शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही सोबत असावे यासाठी पहिले पाऊल टाकले आहे.

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. आघाडीत सामील व्हावे, यासाठी प्रस्ताव दिला गेला. त्यात काँग्रेसनेही सोबत यावे यावरही चर्चा झाली. शरद पवार यासाठी आता काँग्रेस नेत्यांशी चर्चा करणार आहेत.

स्वतः केलेली कामे दुर्बीण लावून स्वतःच शोधत आहेत, घरोघरी जाऊन पॉकेट बुक वाटत आहेत, 'करुन दाखवलं'चे गाताय जर गाणे,, पॉकेट बुक मध्ये कशाला लावली मग द्वेषाची पाने?

अंगात नाही बळ तरी काँग्रेसची स्वबळाची भाषा, तथाकथित मर्दांच्या पक्षाला मात्र मनसेच्या पांगुळ गाड्याची आशा.

मारली लाथ काँग्रेसने जोराची, आता उभे राष्ट्रवादी(शप) च्या दारात पसरुन पदर, म्हणून आम्ही सांगत होतो करा सदैव हिंदुत्वाची कदर, यांनी काय केले.. सजवली याकूब मेमनची कबर .

ज्यांच्या जगण्यात उरला नाही भगवान राम काय करणार हे मुंबईकरांसाठी काम?



## देशात उत्पादित होईल ते स्वदेशी, अशी केली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वदेशीची नवी व्याख्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

देशात जे उत्पादित होईल, ते स्वदेशी. मग उत्पादन करणारी कंपनी देशी असो किंवा देशाबाहेरील, अशी स्वदेशीची नवीन संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. पहिल्या टप्प्यात आपल्या हे स्वीकारावेच लागेल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमच्या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात मुख्यमंत्री बोलत होते. हिंदू एक विचार आहे. एक व्यवस्था आहे. जगण्याची एक पद्धत आहे. ही एकमेव संस्कृती आहे, जी हजारो वर्षांनंतरही जिवंत आहे. आम्ही नेहमी असे सांगत असतो की, भूतकाळात आम्ही किती प्रगत होतो, किती वैभवशाली होतो. भूतकाळातील वैभव, प्रगती फक्त सांगून उपयोग नाही, ती आता प्रत्यक्षात आणली पाहिजे. समृद्ध देश जग चालवतात. समृद्धी देशाचे विचार, परंपरा जगात स्वीकारल्या जातात. त्यामुळे आपण स्वतःला समृद्ध बनवले पाहिजे. त्यासाठी स्वदेशीला चालना दिली पाहिजे.१४० कोटीचा देश आत्मनिर्भर झाला पाहिजे, तो परावलंबी असून उपयोगाचा नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात जे देशात तयार होते, ते सर्व स्वदेशी, असे म्हटले पाहिजे. मग ते तयार करणारी कंपनी देशी असो किंवा देशाबाहेरील. दुसऱ्या टप्प्यात या बाबत वेगळा विचार करता येईल, असेही फडणवीस म्हणाले.जगातील लोकांचा चीनवर विश्वास नाही, मोठमोठे कर्ज देऊन चीन आपल्या देशावर कब्जा करतो, अशी भावना जगभरात आहे. भारताबाबत मात्र जगाला आपलेपणा, ममत्व आहे. वसुधैवकुटुंबकम या भारताच्या संस्कृतीचा प्रत्यय जगभरात येतो. त्यामुळे भारतीय उद्योगाला जगाचे दरवाजे खुले आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

## पुण्यात दोन्ही महापालिकांमध्ये भाजपची पुन्हा सत्ता

### निवडणुकीनंतर अजित पवारांशी युती नाही - चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९पुणे**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी परस्पर विरोधी लढणार आहेत. भाजपने आजवर केलेल्या कामाच्या जोरावर दोन्ही महापालिकांमध्ये भाजपची पुन्हा सत्ता येणार आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर या दोन महापालिकांमध्ये अजित पवार यांची साथ घेण्याची किंवा त्यांच्याशी युती करण्याची वेळ येणार नाही, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.




पुणे प्रेस क्लबसाठी राज्य सरकारने जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल पुणे पत्रकार प्रतिष्ठान आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या वतीने गुरुवारी कृतज्ञता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बावनकुळे बोलत होते. यावेळी चेतनानंद गावडे महाराज, पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष शैलेश काळे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रीजमोहन पाटील, पांडूरंग सांडभोर, मंगेश फल्ले, उमेश शेळके, सुनित भावे, अंजली खमितकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यातील महापालिकांची निवडणूक भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना युतीच्या माध्यमातून लढणार आहे. या युतीपासून अजित पवार यांना दूर ठेवण्यात आल्याने पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत अजित पवारांची राष्ट्रवादी शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी करणार असल्याची चर्चा सुरू आहे.

बावनकुळे म्हणाले, कोणाशी आघाडी करायची हा अजित पवार व त्यांच्या पक्षाचा व्यक्तिगत प्रश्न आहे. हा प्रयोग स्थानिक आहे. त्यामुळे या प्रयोगाचा राज्यातील सत्तेवर कसलाही परिणाम होणार नाही. आम्ही आणि अजित पवार आमने सामने लढलो तरी आमच्यात कटुता येणार नाही, याची आम्ही काळजी घेऊ. भाजपने शहरात केलेल्या कामाच्या बळावर दोन्ही महापालिकांमध्ये भाजप शिवसेना युतीला यश मिळेल. त्यामुळे निवडणुकीनंतर पुण्यात अजित पवारांची साथ घेण्याची वेळच आमच्यावर येणार नाही. काही पक्ष प्रवेशांना स्थानिक आमदारांचा विरोध असेल, तर त्यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल. शेवटी संसदीय राजकारणात आकड्यांना महत्त्व असते. अपेक्षित आकडा गाठण्यासाठी काही पक्षप्रवेश करावे लागतील, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

## नागपूरच्या MIDC मधील पाण्याची टाकी कोसळली, ३ जणांचा मृत्यू, अनेकजण मलब्याखाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

उपराजाधानी नागपूरमधील चखऊ मध्ये मोठी दुर्घटना झाली. निर्माणाधीन टाकी कोसळल्यामुळे अनेकजण दबले गेलेत. या दुर्घटनेत आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. ८ जण जखमी असून त्यांच्यावर जवळच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. टाकीच्या मलब्याखाली आणखी काही कामगार अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. आज सकाळी ११ वाजता ही दुर्घटना घडली. पाण्याची टाकी कशी कोसळली? याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही. पोलीस अन् बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आहे.

नागपूरमधील बुट्टीबोरी एमआयडीसीमधील अवाडा कंपनीमध्ये निर्माणाधीन टाकी आज सकाळी ११ वाजता कोसळली. अनेकजण यावेळी काम करत होते, त्यावेळी अचानक टाकी कोसळली. या दुर्घटनेत आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ८ जणांना बाहेर काढण्यात आलेय. त्यांच्यावर जवळच्या रूग्णलायात उपचार सुरू आहेत. टाकीच्या मलब्याखाली काही कामगार आणखी अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांकडून या ठिकाणी बचावकार्य वेगात केले जात आहे.

नागपूर ते चंद्रपूर महामार्गावरील बुट्टीबोरी येथील अवाडा ही सोलर पॅनल तयार करणारी कंपनी आहे. या कंपनीमध्ये एक टाकी तयार करण्यात येत होती. याचे काम अंतिम टप्प्यात पोहचले होते. पण आज सकाळी ११ वाजता टाकी कोसळली अन् अनेकजण मलब्याखाली दबले गेले. दुर्घटनेचे व्हिडिओ अन् फोटो पाहून मृताची आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## अमरावती महानगरपालिका निवडणूक संदर्भात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेची तयारी, नियोजन व अंमलबजावणी याबाबत आज दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. ही बैठक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये आदर्श आचारसंहितेचे पालन, प्रचार नियम, निवडणूक खर्च मर्यादा, तसेच शांततापूर्ण व निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांचा समावेश होता.निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना सांगितले की, लोकशाही व्यवस्थेतील निवडणूक ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून ती पारदर्शक, निर्भय आणि कायदेशीर पद्धतीने पार पाडणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य आवश्यक असून निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आपले प्रश्न व सूचना मांडल्या. या सर्व बाबींवर निवडणूक अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली.बैठकीदरम्यान निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच सर्व नागरिकांना निर्भय वातावरणात मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी प्रशासन सज्ज असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.या बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, अमरावती महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, निवडणूक विभागाचे कर्मचारी तसेच विविध राष्ट्रीय व स्थानिक राजकीय पक्षांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित होते. संपूर्ण बैठक सकारात्मक व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली.



## कोकाटेंची तुरुंगवारी टळली, पण आमदारकी जाणार : जामीन मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

राष्ट्रवादीचे नेते माणिकराव कोकाटे यांना उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. माणिकराव कोकाटेंच्या शिक्षेला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसेच या याचिकेवरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. माणिकराव कोकाटेंना फक्त दोन वर्षांची शिक्षा असल्याने त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आल्याचं कोर्टाने म्हटलं आहे. पण नाशिक सत्र न्यायालयाच्या निकालाला ही स्थगिती नाही, त्यामुळे त्यांच्या आमदारकीला धोका कायम असल्याचं सांगण्यात येतंय.



राष्ट्रवादीचे नेते माणिकराव कोकाटे यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयात युक्तिवाद सुरू आहे. सत्र न्यायालयाने कोकाटेंना दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर त्याच्या विरोधात माणिकराव कोकाटे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. सत्र न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला स्थगितीची याचिकेत मागणी करण्यात आली आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकांचा लाभ घेतल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे यांना सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावणी आहे. याप्रकरणी सत्र न्यायालयाच्या निकालाविरोधात माणिकराव कोकाटेंनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर न्या. आर एन लड्ढा यांच्या एकलपीठासमोर सुनावणी पार पडली.

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकांचा लाभ घेतल्याप्रकरणी अडचणीत आलेले माणिकराव कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. असं असलं तरी अद्याप त्यांच्या अडचणी कमी झालेल्या नाहीत. एकीकडे त्यांना अटकेची भीती असताना दुसरीकडे त्यांची आमदारकी देखील धोक्यात आहे.

## संपादकीय ......

# राजकारणाचे अध:पतन!

*सत्तेचा वापर आणि गैरवापर यातील सीमारेषा जसजशी पुसट होत चालली आहे, तसतसा जनतेचा राजकारण्यांवरील विश्वास कोलमडत आहे. नाशिकच्या सदनिका घोटाळ्यात दोषी ठरलेले राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे हे याचेच ताजे उदाहरण ठरले आहेत. आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखून ठेवलेली योजना वापरून, स्वत:ला गरीब दाखवून, घर मिळवणार्या या मंत्र्याने केवळ कायद्याचा गैरफायदा घेतलेला नाही, तर सार्वजनिक पदाचा अपमान केला आहे. न्यायालयाने दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावल्यावरही मंत्रीपद कायम राखले जाणे हे लोकशाहीतील नीतिमूल्यांच्या विटाळाची जाणीव करून देते. कोकाटे यांच्या संपत्तीतील चमत्कारिक वाढ ही त्यांच्या राजकीय प्रवासाची खरी कहाणी उलगडते. दहा वर्षांत ६ कोटींपासून तब्बल ४८ कोटींपर्यंत झेप घेणारी मालमत्ता म्हणजे पारदर्शकतेच्या धबधब्याऐवजी सत्तेच्या सोन्याच्या नळातून वाहणार्या विशेषाधिकारांचे प्रतीक आहे. ज्या व्यक्तीने शेतकर्यांचे प्रतिनिधित्व केले, कृषीखात्याचा कारभार पाहिला, त्याच्यावर अशी कलंकित नोंद लागणे ही शेतकरी वर्गाबरोबर प्रामाणिक सेवकवर्गासाठीही अपमानास्पद बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या खात्यावरून कोकाटेंना मुक्त केले असले, तरी बिनखात्याचे मंत्री म्हणून त्यांचा दर्जा कायम ठेवण्यात आला. हे चित्र म्हणजे जबाबदारी आणि नैतिकता यांच्यातील तडजोड दाखवणारे प्रतीक आहे. एखादा मंत्री न्यायालयीन शिक्षेच्या छायेखाली असताना तो सत्ताकेंद्रात बसलेला दिसतो, तर मग भ्रष्टाचाराविरुद्धच्या भाषणांना काय अर्थ उरतो? फडणवीस सरकारने एका दोषी ठरलेल्या व्यक्तीला मंत्रीपदावर टिकवून केवळ राजकीय सोय पाहिली आहे, जनतेचा विश्वास नाही. जनतेच्या पैशावर आणि विश्वासावर उभ्या असलेल्या सत्तेत, अशा वर्तनाला माफी देण्यास जागा नाही. मंत्री हे पद नाही, ती जबाबदारी असते. ती जबाबदारी न पेलणार्या व्यक्तींनी सत्तेपासून दूर राहावे हीच लोकशाहीची खरी कसोटी. कोकाटेंचे प्रकरण हे केवळ एका मंत्र्याच्या गैरकृत्याचे प्रतीक नसून, सत्तेत नैतिकतेचा श्वास उरला आहे का, यावरच प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे.*

*काही मित्र पक्ष आणि शत्रू पक्ष एकत्र येऊन कोकाटेंना त्रास देत आहेत, असे राष्ट्रवादीतील काही नेते वाहिन्यांवर उघडपणे बोलत आहेत. वास्तविक, कोकाटेंवर केवळ भ्रष्टाचाराचे आरोप झालेले नाहीत, तर त्यांच्यावरचे आरोप न्यायालयात सिद्ध झालेले आहेत. त्यामुळे कोकाटेंना कोणी राजकीय नेते लक्ष्य करीत आहेत असे म्हणणे पूर्णत: बिनबुडाचे ठरते. या पार्श्वभूमीवर कोकाटेंना समर्थन देणे ही बाब भ्रष्टाचाराला समर्थन देण्यासारखी आहे. खरे तर कोकाटेंच्या विरोधात न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देऊन पुढील कायदेशीर प्रक्रियेला प्रामाणिकपणे सामोरे जायला हवे होते. मात्र तसे न करता ते प्रक्रियेपासून दूर पळत राहिले इतकेच नाही, तर आरोग्याचे कारण देऊन लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. ठणठणीत असलेले असे नेते निकालानंतर अचानक आजारी कसे पडतात आणि हॉस्पिटल त्यांना दाखल कसे करून घेते, या बाबीचीही चौकशी व्हायला हवी. आता कोकाटेंच्या जागी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रीपद मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. असे झाले तर हे दृश्य राज्याच्या राजकीय संस्कृतीवर काळा ठिपका उमटवणारे ठरेल. ज्या मुंडेंवर अद्याप देशमुख खूनप्रकरणाचे ढग कायम आहेत, आणि ज्यांची निर्दोषता न्यायालयीन चौकशीत सिद्ध झालेली नाही, त्या व्यक्तीचे नाव पुन्हा मंत्रिपदासाठी पुढे येणे ही बाब राजकीय नैतिकतेला काळीमा फासणारी आहे. ज्या राज्यात भ्रष्टाचार आणि गुन्ह्यांच्या सावल्या अंगावर घेऊन मंत्रीपदाची चर्चा होते, त्या राज्यात जनतेचा विश्वास जिवंत कसा राहणार? भाजप आणि राष्ट्रवादी यांच्या युतीने बनलेल्या या सरकारकडून किमान शुचिता, जबाबदारी आणि सार्वजनिक प्रतिमेचा आदर अपेक्षित होता. पण वास्तव उलट घडत आहे. कोकाटेंना मंत्रीपदावर ठेवून त्यांच्याकडून केवळ खाते काढणे हा नैतिकतेचा अपमान होता, आणि आता त्यांच्या जागी अशा व्यक्तीचा विचार होणे, ज्यांना अजून स्वच्छ प्रतिमा मिळालेली नाही, हे सरळसरळ जनतेचा विश्वास उडवणे आहे.*

*दोषसिद्धीपूर्वी निर्दोषतेचा फायदा देणे योग्य असू शकते, पण त्यावर आधार ठेवून जबाबदारीचे पद देणे हे जनतेच्या न्यायबुद्धीचा अपमान आहे. कोकाटेंसारखा दोषी मंत्री आणि अजून क्लीन चिट मिळालेली नाही अशा मुंडेंच्या मंत्रिपदाच्या चर्चेतील समानता म्हणजे, सत्ताधार्यांच्या दृष्टीने अपराध आता अडथळा नसून, काही वेळा पात्रतेचाच भाग बनला आहे. ही विचारसरणी लोकशाहीला नष्ट करणारी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आता संतुलनाचे, जबाबदारीचे आणि नीतिनियमांचे जेवढे उच्चार होतात, तेवढेच त्यांचे उल्लंघन दिसते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि त्यांच्या पक्षांनी स्वत:च्या कृतींचा आरसा समोर ठेवावा. भ्रष्टाचाराविरुद्धच्या भाषणांनी पोट भरत नाही. राजकीय नैतिकता कृतीतून दिसायला हवी. पण सध्याचे सत्ताधारी पक्ष जनतेला जी प्रतिमा दाखवत आहेत, धनंजय मुंडे यांच्या नावाची चर्चा अजूनही थांबत नसेल, तर ती फक्त त्यांच्या प्रभावामुळे नाही, तर सत्तेतील 'पारस्परिक सोयी' या अदृश्य समझोत्यामुळे आहे. अशी सोयच अखेर महाराष्ट्राच्या राजकारणाला सर्वस्व गमवायला लावते. महाराष्ट्राची जनता मूर्ख नाही. ती पाहते, ऐकते आणि लक्षात ठेवते. आज कोकाटे गेले, उद्या मुंडे येतील, पण प्रश्न एकच राहील. नेमके कोण चालवत आहे हे राज्य? जनता की काही मोजके सत्तापिपासू राजकारणी?*

# राज्यातील महत्वपूर्ण सात जिल्ह्यांतील
# आदिवासी व अती दुर्गम भागातील बालमृत्यूचे वाढते प्रमाण धक्कादायक!



एकीकडे सरकार सांगते की महाराष्ट्राचा विकास मोठ्या झपाट्याने होत आहे.तर दुसरीकडे आदिवासी व अती दुर्गम भागातील रहिवाशांची हालत अत्यंत खस्ता असल्याचे बालमृत्यूच्या वाढत्या प्रमाणावरून लक्षात येते.राज्यातील महत्वपूर्ण सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत तब्बल १४५२६ बालमृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान १२ डिसेंबरला विधानसभेत लेखी उत्तरात दिली. २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला व यवतमाळ अशा नामांकित जिल्ह्यांमध्ये वाढते बालमृत्यूचे प्रमाण अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे.बालमृत्यूचे अनेक कारणे असू शकतात परंतु या संपूर्ण कारणांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे बालमृत्यू वाढल्याचे दिसून येते.बालमृत्यूच्या वाढत्या प्रमाणावरून लक्षात येते की सरकारच्या निष्काळजीपणामुळे या सातही जिल्ह्यामध्ये आरोग्य सुविधा संपुर्णपणे ढासळलेली असुन अस्तव्यस्त अवस्थेत असल्याचे स्पष्ट दिसून येते.यावरून स्पष्ट होते की या सात जिल्ह्यांमध्ये ३ वर्षांच्या काळात १४५२६ बालमृत्यू झालेत,तर या अगोदर कितीतरी बालमृत्यू झाले असावे याची गणना आणखी धक्कादायक असु शकते.त्यामुळे बालमृत्यूचे वाढते प्रमाण हा अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.आपण जेव्हा राज्याच्या विकासाची भाषा बोलतो आणि करतो तेव्हा सर्वच स्तरातून विकास होणे आवश्यक असते परंतु तसे झालेच नाही त्यामुळे या सात जिल्ह्यांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने सरकारचे लक्ष आतापर्यंत का गेले नाही? राज्यात मोठमोठ्या आरोग्य सुविधांची घोषणा केली जाते त्या या ठिकाणी का करण्यात आल्या नाहीत? ज्या आदिवासी भागात किंवा अती दुर्गम भागात आरोग्य योजनेची आवश्यकता आहे त्या का पोहचल्या नाही? आणि सरकारने आतापर्यंत या बाबतची कठोर चौकशी का केली नाही?असे अनेक प्रश्न वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणावरून उपस्थित होतात.राज्याचा विकास झालाच पाहिजे यात दुमत नाही आणि होत आहे परंतु विकासासोबतच आरोग्य सुविधा सुदृढ व्हायलाच हवी.अती दुर्गम भागातील व आदिवासी भागातील अशी गंभीर परिस्थिती पहाता अंगावर शहारे येतात.यावरून स्पष्ट होते की, सरकार व त्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी तेथील रहिवाशांवर पुर्णपणे दुर्लक्ष करीत असावेत.त्यामुळेच ही गंभीर परिस्थिती उध्दभवत असावी असे मला वाटते.सरकारने राज्यात अनेक योजना आणल्यात आणि राबवित सुध्दा आहेत ही आनंदाची बाब आहे याचे स्वागतच.परंतु या सात जिल्ह्यांतील बालक मृत्यूशी झुंज देतात हे सरकारला आतापर्यंत कसे काय दिसले नाही? ही आश्चर्याची बाब आहे बालमृत्यूची आकडेवारी सरकारने स्वतः विधानसभेत मांडली.त्यामुळे सरकारला माझा सल्ला आहे की, आपण शहरांचा विकास झपाट्याने करीत आहात याचे स्वागतच.परंतु आदिवासी भाग,अती दुर्गम भागात आपण प्रवेश करावा आणि तेथील जनतेच्या समस्यांची चौकशी करावी व आरोग्य सुविधा,अन्न,वस्त्र आणि निवारा याबद्दलची कठोर पाऊले उचलुन तेथे सरकारने ताबडतोब आरोग्य सुविधांसह इतरही संपूर्ण सुविधा प्रदान कराव्यात.कारण नामांकित जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने बालमृत्यू म्हणजे सरकार मार्फत या भागात दुर्लक्ष करून झालेली हत्याच म्हणावी लागेल.त्यामुळे या संपूर्ण बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने या सातही जिल्ह्यामध्ये जावून तेथील चौकशी करावी व तेथील नागरिकांसाठी ताबडतोब आरोग्याच्या दृष्टिकोनातून लागणाऱ्या संपूर्ण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात?

**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# घोरणं बंद करणारे ४ सोपे उपाय-झोपही लागेल गाढ!

## घोरण्यामुळे तुम्हाला नावं ठेवणारेही होतील बदल पाहून चकीत



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

अनेकांना रात्री घोरण्याची सवय असते. या आवाजामुळे घरातील इतर मंडळींची झोप पूर्ण होत नाही किंवा अनेकदा ते दचकून उठतात.

घोरणे ही सामान्य समस्या जरी असली तरी या आवाजामुळे अनेकांची झोप मोड होते. पण याचा सगळ्यात जास्त त्रास घोरण्याला व्यक्तीला होत असतो.घोरणं ही फक्त सवय नसून अनेकदा ते आपल्या आरोग्याशी संबंधित समस्या असू शकते. सतत घोरणं श्वास घेताना अडथळा येणं, रात्री अचानक श्वास थांबल्यासारखं वाटणं ही लक्षणं दुर्लक्ष करण्यासारखी नाहीत.




घोरण्यामागे अनेक कारणं असू शकतात. झोपेची चुकीची पोझिशन, जास्त वजन, मानेला किंवा घशात आलेली सूज, सर्दी-खोकला, अल्कोहोलचे सेवन या सगळ्यांचा परिणाम आपल्या झोपेवर होतो. काहींना रात्री पोटावर झोपण्याची सवय असते तर काहींना पाठीवर. त्याशिवाय त्यांना झोपच लागत नाही. पण चुकीच्या झोपण्याच्या सवयींमुळे आपण घोरु लागतो. जर आपण काही सवयी वेळीच सुधारल्या तर घोरण्याची समस्या नक्कीच कमी होऊ शकते.

१. हेल्थलाइनच्या वृत्तानुसार पाठीवर झोपल्याने जीभ मागे सरकू लागते. ज्यामुळे श्वसनमार्गावर परिणाम होतो तर एका कुशीवर झोपल्याने श्वसनमार्ग व्यवस्थित सुरु राहतो, ज्यामुळे घोरणे थांबते. जर आपल्यालाही घोरण्याची सवय असेल तर एका कुशीवर झोपा. झोपेच्या कमतरतेमुळे घशाचे स्नायू अधिक सैल होतात. ज्यामुळे घोरण्याची सवय वाढते. त्यासाठी आपण दररोज ७ ते ८ तास झोप घ्यायला हवी.

२. झोपताना उशीचा वापर करा. डोके वर ठेवल्याने आपले वायूमार्ग उघडे राहण्यास मदत होते. बाजारात नाकाची पट्टी किंवा नाकाचा डायलेटर वापरु शकतो. ज्यामुळे नाकपुड्या रुंद करतात. ज्यामुळे श्वास घेणे सोपे होते. झोपण्यापूर्वी दारु पिऊ नका. अल्कोहोल घशाच्या स्नायूंना त्रास देते. त्यासाठी झोपण्यापूर्वी किमान तीन ते चार तासांआधी दारु पिऊ नका.

३. जर आपण झोपेच्या गोळ्या घेत असू तर यामुळे आपले घोरणे अधिक वाढू शकते. अशी औषधे घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या. धूम्रपान केल्यामुळे घसा आणि नाकात सूज येते, ज्यामुळे आपले घोरणे वाढते. घशाभोवती जास्त चरबी वाढली असेल तर श्वसनमार्ग रुंद होतो. त्यामुळे जास्त वजन असणाऱ्या लोकांमध्ये घोरण्याची समस्या अधिक सतावते.

४. पाण्याच्या कमतरतेमुळे घोरण्याची समस्या वाढते. कारण यामुळे नाक आणि घशातील श्लेष्मा जाड होतो. ज्यामुळे श्वसनमार्गात अडथळा निर्माण होतो. यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. त्यासाठी दिवसभरात भरपूर पाणी प्यायला हवे.

# भूमिहीनांना मिळणार आता शेतजमीनचा लाभ; खरेदीसाठी एकरी किती ठरवला आहे दर?

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

राज्य शासनाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत पात्र भूमिहीन व्यक्तींना शेतजमीन खरेदीसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते.

यामध्ये चार एकर जिरायत किंवा दोन एकर बागायत जमिनीचा समावेश आहे. पण, सध्या जमिनीचे दर वाढल्याने संबंधित अनुदानात जमीन मिळणे अवघड आहे. तसेच शेतकरीही जमीन विक्रीसही तयार नसतात हे वास्तवही आहे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन लोकांना शेतजमीन देण्यात येते.यामधून संबंधितांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होईल, असा हेतू असतो. या योजनेंतर्गत राज्य समाजकल्याण विभागाकडे प्रस्ताव पाठवावे लागतात; पण मागील काही वर्षांत कोणालाही या योजनेचा लाभ घेता आलेला नाही.

कारण, जमिनीचे दर मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. यामुळे शासनाने निश्चित केलेल्या भावात जमीन मिळणे अवघड होऊ लागले आहे. परिणामी अनुदानात वाढ होणेही महत्त्वाचे आहे.तरच या योजनेचा चांगला फायदा होऊ शकतो. त्यामुळे जमीन उपलब्ध झाल्यानंतरच शेतजमीन लाभार्थ्यांना मिळणार आहे.




**काय आहे योजना?**

भूमिहीन कुटुंबांना जमीन खरेदीसाठी राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असावा. त्याचबरोबर तो भूमिहीन असणे गरजेचे आहे. तरच तो या योजनेसाठी पात्र ठरतो.

**यांना मिळते प्राधान्य**

- दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन अनुसूचित जाती तथा नवबौद्ध प्रवर्गातील परितक्त्या स्त्रिया.
- दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन अनुसूचित जाती तथा नवबौद्ध प्रवर्गातील विधवा स्त्रिया.
- अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अनुसूचित जातीचे अत्याचारग्रस्त.

**लाभासाठी निकष काय?**

- संबंधित व्यक्ती या योजनेसाठी पात्र असावी.
- लाभार्थ्यांचे किमान वय १८ आणि कमाल ६० वर्षे असावे.

लाभार्थी भूमिहीन असावा.

- त्याने शासनाने निश्चित केलेल्या अटीत तो बसण्याची गरज आहे. तरच या योजनेचा लाभ घेता येतो.
- एकरी पाच अन् आठ लाख रुपये दर
- जिरायत चार एकर किंवा बागायत दोन एकर जमीन मिळते.
- जिरायतसाठी एकरी पाच लाख दर निश्चित केलेला आहे.
- बागायत जमीन खरेदीसाठी आठ लाख दर आहे.
- जमिनीचे वाढलेले दर पाहता कोणीही शेतकरी कमी भावात जमीन विक्रीस धजावत नाही.

# महापालिकेत निवडणूक अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती** - अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची अधिकृत घोषणा करण्यात आली असून दिनांक १५ डिसेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, मुक्त, निष्पक्ष व कायदेशीर पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारीला वेग दिला असून त्या अनुषंगाने निवडणूक अधिकाऱ्यांचे सविस्तर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी १, २, ३ तसेच क्षेत्रीय अधिकारी यांचे निवडणुकीसंदर्भातील प्रशिक्षण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती महानगरपालिका येथे पार पडले.हे प्रशिक्षण अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.



प्रशिक्षण सत्रात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव व उपजिल्हाधिकारी निवडणूक शिवाजी शिंदे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सखोल व मुद्देसूद मार्गदर्शन केले. त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील कायदेशीर तरतुदी, आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी, निवडणूक कार्यक्रमाची अंमलबजावणी, नामनिर्देशन पत्रांची छाननी, प्रचार काळातील नियम, अपात्रतेचे निकष, उमेदवारी मागे घेणे, चिन्ह वाटप, मतपत्रिका छपाई, मतदान यंत्र तयार करणे, मतदान कर्मचारी नियुक्ती व प्रशिक्षण, साहित्य वाटप, प्रत्यक्ष मतदान, मतदान प्रक्रिया, मतमोजणी तसेच आचारसंहिता भंग झाल्यास करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर माहिती दिली.यावेळी आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक काळात सर्व अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता, तत्परता व निष्पक्षता राखून काम करावे, असे निर्देश दिले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने आपली जबाबदारी ओळखून कार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.प्रशिक्षणामुळे निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील शंका दूर होऊन अधिकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल तसेच आगामी महानगरपालिका निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पडण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे उपस्थित होते.

# मार्गशीर्ष महिन्याच्या चौथ्या गुरुवारी शेगावात भाविकांची मांदियाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ शेगाव-** शेगावला धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जाणारा मार्गशीर्ष महिन्यातील चौथ्या गुरुवारी १८ डिसेंबर रोजी श्री संत गजानन महाराज मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी जवळपास ७५ हजार भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. यावेळी हजारो भाविकांनी श्रींच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. तर अनेक भाविकांनी श्रींच्या विजय ग्रंथाचे पारायण केले.मार्गशीर्ष महिन्यातील चौथ्या गुरुवारी श्रींच्या दर्शनासाठी राज्यभरातून हजारो भाविक भक्त शेगावात दाखल झाले होते.अनेक भाविक पहाटेपासून शहरासह तालुक्यातील आपापल्या गावातुन १५ ते २० महिला, पुरुष लहान मुले,मुली, पायी वारी करत शेगावात दाखल झाले होते. यावेळी भाविकांनी श्रींच्या मंदिरात येऊन श्रींच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेऊन परत जात होते.



मार्गशीर्ष महिन्यातील चौथ्या गुरुवारी जवळपास ७५ हजारो भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. भाविकांची संख्या लक्षात घेता श्री संस्थानकडून पहाटे चार वाजे पासून मंदिर श्रींच्या दर्शनासाठी खुले ठेवले होते. श्रीला गुरु मानणाऱ्या हजारो भाविकांनी गुरुवार रोजी श्रींच्या चरणी नतमस्तक होऊन मार्गशीर्ष महिन्यातील चौथ्या गुरुवारी श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. श्रींच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी अनेक भाविक शेकडो किलोमीटर अंतर पायी चालून श्रींच्या मंदिरात दाखल झाले होते. श्रींच्या दर्शनानंतर शेकडो भाविकांनी पारायण कक्षात सहा ते सात तास बसून श्रींच्या श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# कोण होणार नगराध्यक्ष ?

## अचलपूर नगराध्यक्ष २० फेऱ्यानंतर समजणार तर ; नांदगाव, धामणगाव तिसऱ्या फेरीला



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** जिल्ह्यातील सर्वात मोठी नगरपालिका असलेल्या अचलपुरच्या नगराध्यक्षपदाचा निकाल हा तेथील मतमोजणीच्या २० व्या फेरीअखेर कळणार असल्याने दुपारी ३ वाजताच्या दरम्यान तेथील नवे नगराध्यक्ष कोण, हे माहित होईल. त्याचवेळी सर्वात कमी प्रत्येकी तीन फेऱ्यांमध्ये नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे आणि शेंदुरजनाघाटची मतमोजणी आटोपणार असल्याने तेथील नगराध्यक्ष हे दुपारी १२ च्या दरम्यान स्पष्ट होतील, असा अंदाज आहे.

जिल्ह्यातील ९ नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुका गेल्या २ डिसेंबर रोजी पार पडल्या, तर अंजनगाव सुर्जी नगरपालिकेची निवडणूक २० डिसेंबरला होत असून सर्व बाराही नगरपालिका आणि नगरपंचायतींचा निकाल २१ डिसेंबरला घोषित होत आहे.

त्यामुळे अगदी दोन दिवसांवर आलेल्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निकालाबद्दल नागरिकांची उत्सुकता बरीच ताणली आहे. अचलपुर ही जिल्ह्यातील एकमेव 'अ' वर्ग नगरपालिका आहे.

येथील नगरसेवकांची संख्याही सर्वाधिक ३९ आहे. मतमोजणीचा क्रम नगरसेवक आधी आणि नगराध्यक्ष नंतर असा ठरला असल्याने प्रत्येक फेरीअखेर दोन नगरसेवकांचा निकाल घोषित होईल. अशाप्रकारे २० व्या फेरीअखेर सर्व ३९ नगरसेवकांची घोषणा होणार असून या निकालानंतर तेथील नगराध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार कोण, हे माहित होईल. जिल्हा प्रशासनाने केलेल्या तयारीनुसार शेवटून दुसऱ्या क्रमांकावर म्हणजेच दुपारी २ च्या सुमारास चांदूर रेल्वेचा निकाल घोषित होईल. या ठिकाणी ८ फेऱ्या होणार आहेत. तर दर्यापुरात सातव्या आणि अंजनगाव सुर्जी व चांदूरबाजार येथे सहाव्या फेरीअखेर निकाल घोषित होईल. धारणी व चिखलदऱ्यात पाचव्या फेरीअखेर, तर मोर्शी व वरुड येथे चौथ्या फेरीअखेर तेथील नवे नगरसेवक आणि नगराध्यक्ष कळतील. मतमोजणीसाठी तीन ठिकाणी नगरपालिका कार्यालयांची निवड करण्यात आली असून चार ठिकाणी तहसील कार्यालयांची निवड करण्यात आली आहे.

नांदगाव खंडेश्वर येथील मतमोजणी तेथील शासकीय आयटीआयमध्ये होणार असून अचलपुरची मतमोजणी कल्याण मंडपम येथे केली जाणार आहे. नगरपालिका/नपं मतदान टक्के अचलपूर ६९.७३ वरुड ६४.०७ दर्यापूर ६८.६६ मोर्शी ६५.७८ चिखलदरा ८५.२३ शेंदुरजना घाट ७३.५३ चांदूर रेल्वे ६८.४९ चांदूर बाजार ६७.१३ धामणगाव रेल्वे ६७.२१ धारणी नपं. ६४.४३ नांदगाव खंडेश्वर नपं. ७३.३० एकूण ६८.३८ नगरपालिका टेबल फेऱ्या अचलपूर १२ २० अंजनगाव सुर्जी १० ६ दर्यापूर ६ ७ वरुड १४ ४ चांदूर रेल्वे ७ ८ चिखलदरा २ ५ चांदूर बाजार ६ ६ शेंदुरजना घाट ७ ३ धामणगाव रेल्वे ७ ३ मोर्शी १२ ४ नांदगाव खं. (न.पं.) ६ ३ धारणी (न.पं.) ४ ५ मतमोजणीची व्यवस्था ही झालेल्या मतदानाच्या संख्येनुसार करण्यात आली आहे. त्यामुळे विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा येथे सर्वात कमी टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी केवळ दोन टेबल ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका फेरीत केवळ दोन इव्हीएममधील मतांची नोंदणी केली जाईल. अशाप्रकारे पाच फेऱ्यांअखेर येथील नगराध्यक्षांचा निकाल कळेल.

# 'प्रशासक'राज; सामान्यांनी 'मनपा'कडे फिरवली होती पाठ

## प्रभागासाठी संवादासाठी दुवानव्हता: ऑनलाइन तक्रारीउपक्रमाने अनेकांना दिलासा


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

साडेतीन वर्षे प्रशासकराज अनुभवलेल्या अमरावती मनपात आता सार्वत्रिक निवडणुकीची तयारी सुरू झाली. या कालावधीत नगरसेवक नसल्याने प्रशासनाने ऑनलाइन तक्रारी स्वीकारण्यासोबतच काही नवीन उपक्रम राबवले होते. काहींना लाभही झाला.

### लोकांच्या गरजा व समस्यांची अपेक्षा

प्रशासक राज्य सरकारच्या मर्जीनुसार काम करतात. लोकांच्या गरजा, समस्या व अपेक्षा समजून घेऊ शकत नाहीत. यामुळे भ्रष्टाचार वाढण्याची शक्यता असते. लोकांचे नियंत्रण नसते. अमरावती मनपातही २०२२ नंतर सत्ताधारी पक्ष वगळता विरोधी पक्षांनी भ्रष्टाचाराचा आरोप करून आंदोलने केली होती. मात्र, या प्रकरणांची चौकशीच झाली नाही.



मात्र, प्रभागाशी थेट संवाद साधणारे नगरसेवक नसल्याने सामान्यांनी मनपाकडे पाठ फिरवली. समस्यांचा निपटारा करण्याची प्रक्रिया कर्मचाऱ्यांवर निर्भर असल्याने 'काम होऊन जाईल, वाट पाहा' ही उत्तरे मिळायची, निवडणुकीनंतर हे चित्र बदलेल, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.मागील दशकभरात मोठा चंद्रपूरचा विस्तार झाला. त्यामुळे नागरी सुविधांवर ताण पडला. शहराला लागूनच वसाहती तयार झाल्या. त्यामध्ये रस्ते, वीज खांब,नाल्या, पाणीपुरवठा व अन्य सुविधा नाहीत. कचरा संकलन गाडी पोहोचत नसल्याने रस्त्यावरच कचरा टाकला जातो. खुल्या भूखंडांचाही विकास झाला नाही. या भूखंडांवर अवैध कारवाया वाढीस लागल्या. प्रशासकीय कार्यकाळात या समस्यांचा निपटारा करण्यासाठी ऑनलाइन तक्रारी स्वीकारण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला होता. सुरुवातीला सुमारे ५ ते ६ हजार नागरिकांनी तक्रारी केल्या. काही व्यक्तिगत समस्यांचा निपटाराही झाला; पण अनेक सार्वजनिक समस्यांबाबत प्रश्नांकडे पाठपुरावा करणारा दुवा नसल्याने या उपक्रमातही काही दिवसांपासून अनियमितता आली.

# बिबट्याने केली गायीची शिकार

## ढाकुलगाव शेतशिवारातील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९धामणगाव रेल्वे,**

ढाकुलगाव शेतशिवारात बिबट्याने शेतात बांधलेल्या गाईवर हल्ला करून शिकार केल्याची घटना बुधवारला (ता.१७) रात्रीच्या सुमारास घडली घडली. या घटनेमुळे शेतकरी, पशुपालक व ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील ढाकुलगाव येथील सतीश भोंगडे यांची गाय नेहमीप्रमाणे शेतात बांधली राहत होती.

रात्रीच्या सुमारास बिबट्याने या गाईवर हल्ला चढवून शिकार केली. ही घटना गुरुवारला (ता.१८) सकाळी उघडकीस आली. याघटनेची माहितीवनविभागाला देण्यात आली असून बिबट्याला जेरबंद करावे. तसेच वनविभागाने



परिसरात गस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षेची उपाययोजना करावी, अशी मागणी समोर आली आहे. बिबट्याचा वावर असल्याने शेतकरी व ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी एकटे जाणे टाळावे तसेच जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत, असे आवाहनप्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# भूभागाचा अभ्यास करून तातडीने भूकंप मापक यंत्र बसवणार

## सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या ठिय्या आंदोलनानंतर तहसीलदारांचे लेखी पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९तिवसा** : शिवणगाव, शिरजगाव, शेंदोळा या गावात भूकंप सदृश्य धक्के येत असल्याने तातडीने भूकंप मापक यंत्र बसवण्याची मागणी केली होती. २६ नोव्हेंबर रोजी जिवॉलॉजिकल पथक शिवणगावात येऊन थातुरमातूर तपासणी करून भूकंप मापक यंत्र बसवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, २३ दिवसानंतरही त्याची पूर्तता झाली नसल्याने अखेर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या नेतृत्वात तिवसा तहसीलदार यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. दरम्यान चार तास ठिय्या मांडल्यानंतर शिवणगाव येथील भुभागाचा अभ्यास करून जीएसआय विभाग भूकंप मापक यंत्र बसवण्यासाठी केंद्र सरकारची मान्यता मिळताच यंत्र तत्काळ बसवण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन तहसीलदार मयूर कळसे यांनी दिले आहे.

दुपारी १२.३० वाजता सुरू झालेल्या ठिय्या आंदोलनानंतर तहसीलदार कळसे यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची भेट घेऊन संबंधित ठिय्या आंदोलनाची माहिती दिली. दरम्यान शिवनगाव आणि आजूबाजूच्या शिवारात येत असलेल्या भूकंप सदृश्य धक्यांमुळे स्थानिक नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याची माहिती दिली. शिवाय, स्थानिक नागरिकांकडून तातडीने भूकंप मापक यंत्र बसवण्याच्या मागणीला वेग आल्याचेही माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. यादरम्यान तहसीलदार कळसे



आणि प्रशांत कांबळे यांच्यात फोनद्वारे चर्चा झाल्यानंतर लेखी आश्वासन दिल्याशिवाय ठिय्या आंदोलनातून माघार घेणार नसल्याचा इशारा दिला होता.

त्यामुळे तहसीलदार कळसे यांनी लेखी आश्वासन दिले आहे. ज्यामध्ये २६ नोव्हेंबर रोजी जीएसआय पथकाने शिवणगाव येथील भूभागाची पाहणी केली असून, त्यासबंधित अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे. त्यानंतर आता पुन्हा नव्याने जीएसआय पथकाकडून शिवणगाव येथील जमिनीत खोदकाम करून जमिनीतील मातीचे नमुने आणि परीक्षण करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.

शिवाय, यंत्र बसवण्यासंदर्भात केंद्र सरकारची परवानगी लागत असल्याने परवानगी मागण्यात आली असून, परवानगी मिळताच यंत्र बसवण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्याने अखेर प्रशांत कांबळे यांनी ठिय्या आंदोलनातून माघार घेतली आहे. यावेळी शिवणगाव सरपंच धर्मराज खडसे, महादेव अंबूलकर, कैलास कठाळे, चंद्रवदन खोब्रागडे, नरेश साबळे, रमेश डेहनकर, जसबीर ठाकूर, प्रशांत प्रधान, शरद धसकट, स्वप्नील निस्ताने, एड. विकास तुरकाने, प्रकाश चिचखेडे, राहुल येरणे, सुधाकर तुरकाने यासह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

बॉक्सभूकंप धक्का येऊन शिवणगाव किंवा आजूबाजूच्या कोणत्याही गावात जीवित हानी झाल्यास याला सर्वस्वी जबाबदार स्थानिक प्रशासन आणि केंद्र सरकार राहणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने भूकंप मापक यंत्र बसवण्यासाठी तातडीने मान्यता द्यावी. अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन केंद्र सरकारच्या विरोधात छेडण्यात येईल.– प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते–

# २३ नोव्हेंबरला शहरातील पाणी पुरवठा राहणार बंद

## मोर्शी सबस्टेशनमध्ये दुरुस्ती काम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या सिंभोरा हेडवर्क्स येथे



महाराष्ट्रराज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत १३२ के.व्ही. व३३ के. व्ही. मोर्शी सबस्टेशन येथे देखभाल व दुरुस्तीचे काम नियोजित आहे. त्यामुळे सिंभोरा येथील विद्युत पुरवठा व पंपीग बंद राहणार असून मंगळवार २३ नोव्हेंबर २०२५ रोजी संपूर्ण दिवसभर अमरावती व बडनेरा शहरात होणारा पाणी पुरवठा बंद राहील.

नागरीकांनी पाण्याचा साठा करुन ठेवावा व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे मजीप्रा मार्फत आवाहन कार्यकारी अभियंता म.जि.प्रा. जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांनी केले आहे.

# नागरिकांच्या एकजुटीला यश !

## साईनगरातील 'बंद' पोलीस चौकी अखेर सुरू

### तुषार भारतीय यांचा यशस्वी पाठपुरावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** महानगर पालिका क्षेत्रातील साईनगर (प्रभाग क्र. १९) परिसरात वाढत्या गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी स्थानिक नागरिकांनी दिलेल्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. बडनेरा, राजापेठ आणि खोलापुरी गेट या तीन पोलीस ठाण्यांच्या सीमेवर असलेली आणि गेल्या काही दिवसांपासून बंद पडलेली राजापेठ पोलिस डाण्याची साईनगर पोलीस चौकी अखेर पुन्हा कार्यान्वित करण्यात आली आहे.

साईनगर परिसर हा भौगोलिकदृष्ट्या तीनपोलीस



ठाण्यांच्या सीमांना लागून असल्याने या ठिकाणच्या स्थानीय वसाहती तसेच इतर दुकानात चोरी, घरफोडी आणि इतर गुन्हेगारी कृत्यांचे प्रमाण वाढले होते. त्या मध्ये स्थानीय पोलिसांकडून क्षेत्रात कडक कारवाई करावी ही नागरिकांची मुख्य भूमिका होती तसेच हद्दीच्या वादाचा फायदा घेत गुन्हेगारांनी उच्छाद मांडल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे. वातावरण होते. ही परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून नागरिकांनी संघटित होऊन पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता.तोडगा काढण्यासाठी प्रभागाचे माजी नगरसेवक तुषार भारतीय तथा चेतन गावंडे सोबत नागरिकांच्या शिष्टमंडळाने तत्कालीन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांची भेट घेऊन परिसरातील पाढा वाचला होता.

# शिवार फुललं तूर पिकांनी बळीराजा आनंदला!

## पोषक हवामानामुळे चांगल्या उत्पादनाची शेतकऱ्यांना आशा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अचलपूर** – ३अमरावती जिल्ह्यातील शेतकरी सध्या नैसर्गिक अनुकूलतेमुळे सुखावले असून विशेषतः अचलपूर तालुक्यात तूर पिकाच्या शिवारांनी अक्षरशः बहर घेतला आहे. जिथे नजर जाईल तिथे पिवळ्याधम्मक फुलांचा गालिचा अंथरल्यासारखे मनमोहक दृश्य पाहायला मिळत आहे. थंडीची योग्य साथ, पोषक हवामान आणि वेळेवर मिळालेल्या पाण्यामुळे यंदा तूर पीक विक्रमी बहरात आले असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाची लाट पसरली आहे.

तूर हे खरिप हंगामातील महत्त्वाचे कडधान्य पीक असून वाढीच्या व फुलोऱ्याच्या टप्प्यात दीर्घकाळ टिकणारी थंडी आणि योग्य आर्द्रता



आवश्यक असते. यंदा नेमकी हीच नैसर्गिक अनुकूलता लाभल्याने फुलांची गळती न होता प्रत्येक फांदीवर दाट व निरोगी फुलोरा आला आहे. हा फुलोरा पुढील काळात चांगल्या शेंगा भरण्याचे स्पष्ट संकेत देत आहे.थंडीमुळे व वेळेवर केलेल्या नियोजनामुळे यंदा मावा तसेच इतर शोषक किडींचा प्रादुर्भाव कमी दिसून आला. त्यामुळे कीटकनाशकांवरील खर्चात बचत झाली असून पीक अधिक निरोगी राहिले आहे. सध्या अनेक ठिकाणी शेंगांचे घड लागलेले दिसत असून उत्पादन चांगले होणार, याबाबत शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण आहे.आता पुढील काही आठवड्यांत पीक परिपक्व होणार असून अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याचा धोका टळल्यास हे सोनेरी स्वप्न साकार होईल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करीत आहेत. मात्र उत्पादन चांगले येणार असल्याने शासनाने तूर पिकाला योग्य हमीभाव द्यावा, अशी मागणी बळीराजाकडून जोर धरू लागली आहे. शिवारात डोलणाऱ्या पिवळ्या फुलांकडे पाहून शेतकरी आशेने सुखावलेला दिसत आहे.

# आयशर ट्रकमधून गोवंशांची तस्करी

## २० गोवंशासह दोन आरोपींना अटक

### १८.५३ लाखांचा माल जप्त शिरखेड परीसरात एलसीबीची मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९शिरखेड** आयशर ट्रकमधून तस्करी करताना २० गोवंशताब्यात घेतले. गुरुवारला ग्रामीण गुन्हे शाखेने शिरखेड पोलीस ठाण्याच्या परिसरात ही मोठी कारवाई केली. ट्रक सोडून दोन आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी दोघांचाही सिनेस्टाईल पाठलाग करून अटक केली. या कारवाईत आयशरसह १८.५३ लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. गुरुवारी, ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विशाल रोकडे पथकासह शिरखेड पोलीस ठाण्याच्या परिसरात गस्त घालत होते. दरम्यान, गोवंशीय जनावरे मोर्शीहून अमरावतीला आयशर ट्रकमध्ये नेली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली .माहितीच्या आधारे, शिरखेड फाटा येथे नाकाबंदी करण्यात आली. पोलिसांना पाहताच ट्रक चालकाने गाडी घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला. शिरखेड फाटाजवळशिरखेड रोडवर पोलिस पथकाने पाठलाग करून गाडी थांबवली. गाडीतून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन्ही आरोपींना सिनेस्टाईल अटक करण्यात आली. शेख साबीर शेख कादीर (३५, आर्वी, वर्धा जिल्हा)



आणि शेख अयान शेख नसीर (२०, लालखाडी, क्लिनर) अशी अटकेतील आरोपींची नावे आहे.

ट्रकची झडती घेतली असता २० गोवंशीय जनावरे आढळून आली. या कारवाईत एकूण १८५,३०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. जप्त केलेले वाहन, गोवंशीय जनावरे, मोबाईल फोन आणि दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी शिरखेड पोलिस ठाण्यात सुपूर्द करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद आणि पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय ईश्वर वर्गे, विशाल रोकडे, संतोष तेलंग, दीपक पाल, मनोज कलासकर, अमित राऊत, गजानन तिजारे, नितेश असोलकर, दीपक पाटील, मारुती वैद्य आणि किशोर सुने यांनी केली.

## अमरावती शहर गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

# अवघ्या ८ तासांत जबरी चोरी उघडकीस; दोन आरोपी अटक, २.५७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९ अमरावती** अमरावती शहरातील जबरी चोरीचा गंभीर गुन्हा अवघ्या आठ तासांत उघडकीस आणत शहर गुन्हे शाखेने दोन आरोपींना अटक करून चोरीतील मुद्देमाल जप्त केला आहे. मा. पोलीस आयुक्त श्री. राकेश ओला यांच्या आदेशानुसार व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रभावी कारवाई करण्यात आली.पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे सुनिल सहदेवराव पवार (वय ४४, रा. बोरज, ता. चांदूर बाजार) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, भातकुली रोडवरील निळकंठ शाळेजवळ पाणी घेण्यासाठी थांबले असता दोन अज्ञात इसमांनी दारूची बाटली फोडून धमकावत त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन, दोन सोन्याच्या अंगठ्या व रोख रक्कम असा





एकूण १.४९ लाख रुपयांचा मुद्देमाल जबरीने हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा समांतर तपास करताना गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरून आरोपी बादल नारायणराव बागवाले (वय २२, रा. आमले प्लॉट, महाजनपुरा) व रोहित तुसलीदास रामटेके (वय १९, रा. दत्तुवाडी, महाजनपुरा) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.आरोपींकडून सोन्याची चैन (१३.५ ग्रॅम), एक सोन्याची अंगठी, तसेच रोख रक्कम असा आजच्या बाजारभावानुसार सुमारे २.५७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखेने कौशल्यपूर्ण तपास करून हा गंभीर गुन्हा अवघ्या आठ तासांत उघडकीस आणला.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, तसेच अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या केली.

# मनपा निवडणुकीवर प्राथमिक चर्चा पूर्ण

## मनसे नेते राजू उंबरकर यांची शिवसेना कार्यालयाला भेट

### दोन्ही पक्षनेत्यांचा एकत्र मोठा मेळावा घेण्यावर एकमत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**, मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकनंतर आता विदर्भातील आणखी चार महापालिकांमध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या मनसेची युती होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या चारही महापालिका निवडणुकां मध्ये ठाकरे बंधू एकत्र निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. त्यामुळे आता शिवसेना- मनसेची युती एकूण आठ जिल्ह्यांतील महापालिका मध्ये होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राजू उंबरकरयांनी महानगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने अमरावती येथील शिवसेना भवन राजापेठ येथे सदिच्छा भेट दिली.

शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे व राजू उंबरकर यांच्यात अमरावती महानगर पालिका निवडणुकी करिता झाली प्राथमिक चर्चा. यावेळी शिवसेनेच्या पदाधिकारी यांनी मनसे नेते राजू उंबरकर यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन केले स्वागत. शिवसेना पदाधिकारी व मनसे पदाधिकारी यांच्यात खेळीमेळी च्या वातावरणात चर्चा झाली. यावेळी मनसे शहर प्रमुख धीरज तायडे, शिवसेना अमरावती शहर प्रमुख प्रवीणहरमकर, बडनेरा शहर प्रमुख संजय शेटे, मनसेचे नेते राजू उंबरकर, धीरज तायडे, विकी थेटे, पंकज तायडे, मनसे महिला सेना जिल्हाध्यक्ष शरयूताई पाजणकर, प्रवीण डांगे, रावेर गिरी, बबलू आठवले, संजय गव्हाळे, सागर ढोके, आदित्य ठाकर, अतुल सावरकर, सचिन ठाकरे, इंद्रजीत नागदिवे, योगेश सोळंके, राम काळमेघ, विक्को थेटे, अश्विन सातव, प्रवीण घोरपडे, संदेश उल्हे, तुषार तंतरपाळे, वैभव धोटे, प्रांजली वाघमारे, भावना लांजेवार, वैभव धोटे यांच्यासह असंख्य मनसैनिक व शिवसैनिक उपस्थित होते.-

# जि.प.चे नवीन बांधकाम डिव्हिजन ३ वर्षांपासून रखडलेले

## जिल्हाधिकारी यांचा पुढाकारामुळे हालचालींना वेग

### २०२२ मध्ये पाठवलेला प्रस्ताव ऐरणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** जिल्हा परिषदेचा सध्याचा बांधकाम विभाग सर्व १४ तालुक्यांचा व्याप सांभाळण्याच्या दृष्टीने अपुरा पडतो. विशेषत: दीडशे किलोमीटर अंतरावर असलेल्या धारणी व चिखलदरा तालुक्यातील कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जाताना अधिकाऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या विभागाचे विभाजन करुन मेळघाटसाठी स्वतंत्र दुसरे कार्यालय (डिव्हीजन) निर्माण करण्याच्या प्रस्तावाने वेग घेतला आहे. मुळात हा प्रस्ताव गेल्या अनेक महिन्यांपासून शासन दरबारी असतानाच, आता जिल्हाधिकाऱ्यां च्या सूचनेनंतर या प्रस्तावाला नव्याने गती मिळाली आहे. त्यामुळे त्यासंदर्भातील हालचाली वाढल्या असून दोन आमदारांनी पाठपुरावा केल्यामुळे हा विभाग लवकरच दृष्टीपथात येईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषदेने यासंदर्भात ६ डिसेंबर २०२२ पासून शासनाशी पत्रव्यवहार सुरु केला आहे. एवढेच नव्हे तर शासनाने वेळोवेळी सुचविलेल्या सुधारणा करुन सुधारित प्रस्ताव १२ जून २०२३ आणि २६ सप्टेंबर २०२३ रोजी सुधारित प्रस्ताव पाठवण्यात



आला. याच काळात २४ मे २०२३, २४ सप्टेंबर २०२३ आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामविकास विभागाचे कक्ष अधिकारी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडूनही राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार झाला. याबाबत सन २०२२ मध्ये तत्कालीन आमदार बच्चू कडू यांनी जि.प. प्रशासनाला पत्र लिहून नव्या डिव्हीजनचा प्रस्ताव तयार करावा, असे म्हटले होते. त्यानंतर आता २०२५ मध्ये विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांनी अमरावतीच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सदर मागणी रेटली. त्यानंतर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी डीपीसीचे सदस्य सचिव जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निर्देश दिले आहेत.जिल्ह्यात तब्बल ७४२९ किलोमीटर लांबीचे ग्रामीण रस्ते आहेत. त्यासाठी सात उपविभाग करण्यात आले आहेत. मात्र एवढा मोठा व्याप केवळ एका कार्यकारी अभियंत्यांना नियंत्रित करावा लागतो. याशिवाय रस्ते, इमारती, जुन्या इमारतींची डागडूजी अशी मोठ्या प्रमाणावर विकासकामेही सांभाळावी लागतात. सध्या केवळ एकच डिव्हिजन असल्याने कामकाज अक्षरशः विस्कळीत झाल्याची स्थिती आहे. तांत्रिक तपासण्या, नवीन कामांचे नियोजन, रस्ते-इमारतींची देखभाल असे सगळे ओझे एकाच डिव्हीजनवर आहे. त्यातही वाढत्या कामाच्या प्रमाणामुळे विकासाच्या गतीवर बरीच बंधने आली आहेत.

# मनपा निवडणुकीसाठी पोलीस सज्ज

## जुने-नवे वॉंटेड गुन्हेगार रडारवर, मतदारांवर दबाव टाकणाऱ्यांची गय नाही



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेऊन, शहर पोलिसांनी तयारी सुरू केली आहे. लवकरच, निवडणुकीशी संबंधित पुढील नियोजनासंदर्भात ठोस पावले उचलण्यासाठी सर्व पोलिस ठाण्यांच्या संबंधित अधिकाऱ्यां सोबत सीपी राकेळ ओला बैठक घेणार आहेत. शिवाय, मतमोजणीच्या अंतिम टप्प्यापर्यंत कोणतीही घटना घडू नये आणि शहरात कायदा आणि सुव्यवस्था राखली जावी यासाठी विविध पथकांना पूर्ण मार्गदर्शन केले जाईल, अशी माहिती सीपी राकेश ओला यांनी दिली.पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी सांगितले की, निवडणुकीदरम्यान कायदा आणिसुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिस विभागाची आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिय दरम्यान आवश्यक असलेल्या सर्व कृती काटेकोरपणे पार पाडल्या जातील. शहरातील सर्व वॉन्टेड, जुन्या आणि नवीन गुन्हेगारांना पोलिसिंगचा डोस दिला जाईल. याव्यतिरिक्त, शस्त्रास्त्र बंदी, अंमली पदार्थांशी संबंधित गुन्हे आणि दारू तस्करीविरुद्ध कारवाई सुरू केली जाईल. सीमा सीलिंग पॉइंट स्थापित केले जातील आणि शहरात येणाऱ्या सर्व प्रमुख रस्त्यांवर नाकेबंदी केली जाईल. निवडणुकीशीसंबंधित सर्व कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महापालिका निवडणुकीत पूर्वी वॉन्टेड यादीतील अनेक उमेदवार आता सामाजिक कार्य करत निवडणूक रिंगणात उतरत आहेत. विशेषतः, एकाच प्रभावात दोन ते तीन लोक सहभागी असण्याचा ट्रेंड दिसून येत आहे. परिणामी, मतदारांवर दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

या संदर्भात, पोलिस आयुक्त ओला म्हणाले की, सर्वांना निवडणूक लढवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. परंतु शहरात गुंडगिरी कधीही सहन केली जाणार नाही. विशेषतः जर मतदारांवर दबाव आणला गेला आणि कोणत्याही तक्रारी आल्या तर मग, खैर नाही, असा इशारा सीपींनी गेल्या तीन महिन्यांत, शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच, कॉन्ट्रॅक्ट किलिंगच्या अशा तीन घटना उघडकीस आल्या आहेत. पण, कठीण आव्हान असूनही, गुन्हे शाखेच्या पोलिसांना आरोपींना अटक करण्यात यश आले. दरम्यान, सेंट्रल जेलमधील कैद्यांकडून जप्त केलेला अँड्रॉइड मोबाईल फोन देखील चर्चेचा विषय आहे.

# क्रीडा महोत्सवात १५०० विद्यार्थी दमखम दाखवत घेणार सहभाग

## विविध क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंना शिस्त, खेळ भावनेची दिली शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीउत्सवाच्या निमित्ताने श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडांगणा वर आयोजित क्रीडा महोत्सवांतर्गत विविध क्रीडा प्रकारांमध्ये विदर्भातील संस्थेच्या विविध प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांमधील १५०० विद्यार्थी त्यांचा दमखम दाखवत आहेत. प्रत्येकाला वैयक्तिक व सांघिक जेतेपद मिळवायचे असल्याने प्रतिस्पर्धी संघ व खेळाडूंवर ते तुटून पडत आहेत.



महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उद्घाटक म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ.कुलट, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शालेय विभागाचे उपव्यवस्थापक पंडित एस. पंडागळे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे मंचावर उपस्थित होते. क्रीडा महोत्सवाचे ध्वजारोहण केल्यानंतर भाऊसाहेबांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. हर्षवर्धन देशमुख व दिलीपबाबू इंगोले यांनी क्रीडा ज्योत प्रज्वलित करून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. त्यानंतर प्रा. हेमंत देशमुख यांनी खेळाडूंना शिस्त व खेळ भावनेची शपथ दिली. मान्यवरांचे फुलझाड देऊन स्वागत करण्यात आले. खेळाच्या मैदानात सर्वोत्तम कामगिरी करण्याचे मार्गदर्शन हर्षवर्धन देशमुख यांनी केले. त्यानंतर दिलीपबाबू इंगोले यांनी संस्थेने आजवर घेतलेल्या क्रीडा महोत्सवाची पार्श्वभुमी सांगितली. तसेच भाऊसाहेबांचे खेळांसह खेळाडूंबद्दल असलेले योगदान अविस्मरणीय असल्याचे सांगितले. भाऊसाहेबांनी शाळांसोबतच व्यायामशाळांचीही निर्मिती केली. जेणेकरून विद्यार्थी सुदृढ बनून सर्वार्थाने देशाचा रक्षणकर्ता बनावा. खेळाडूंनी शासनाने दिलेल्या सुविधा असोत किंवा खेळाडूंना मिळणारे ५ टक्के आरक्षण असो, याचा लाभ घेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करायला हवा. शाळेतील क्रीडा शिक्षकांनीही त्यांच्याकडे शिकणारा खेळाडू हा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत कसा पोहोचेल, यासाठी प्रयत्न करायला हवेत, असेही ते म्हणाले.

# निवडणूक तयारीला वेग

## अमरावती महानगरपालिका आयुक्तांची बडनेरा झोन कार्यालयास सविस्तर पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बडनेरा झोन कार्यालयाची सविस्तर पाहणी केली. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीतपणे पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून सुरू असलेल्या





नियोजनाचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.या पाहणीदरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बडनेरा प्रभागातील सर्व मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मतदान केंद्रांवरील स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, रॅम्प, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा तसेच सुरक्षा व्यवस्थेची योग्य आखणी करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.निवडणूक काळात कोणतीही गैरसोय अथवा त्रुटी राहू नये, यासाठी पूर्वनियोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत आयुक्तांनी सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. मतदान केंद्रांची यादी, मनुष्यबळ नियोजन, वाहतूक व्यवस्था, साहित्य उपलब्धता तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सज्जता ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.बडनेरा झोनमध्ये निवडणूक प्रक्रिया प्रभावीपणे राबवण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे आवाहन आयुक्तांनी अधिकाऱ्यांना केले. प्रशासन, पोलीस यंत्रणा व इतर संबंधित विभागांमध्ये योग्य समन्वय ठेवून नागरिकांचा विश्वास टिकवणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या पाहणी दरम्यान बडनेरा झोनचे अधिकारी, कर्मचारी तसेच निवडणूक नियोजनाशी संबंधित विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अमरावती महानगरपालिकेने निवडणूक तयारीला गती दिल्याने आगामी निवडणुका यशस्वीपणे पार पडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.या पाहणी दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी विवेक जाधव दक्षिण झोन क्र.४ बडनेरा, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.१ श्रीमती निकीता जावरकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.२ तथा सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे मनपा दक्षिण झोन क्र.४ बडनेरा, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.३ तथा सहाय्यक अभियंता श्रीरंग तायडे, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर उपस्थित होते.

# महापालिकेत एफएसटी, व्हीएसटी व एसएसटीच्या रचना व भूमिकांवर सविस्तर प्रशिक्षण संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती,** महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ पारदर्शक, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पडावी, या उद्देशाने निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या एफएसटी (फ्लाइंग स्कॉड टीम), व्हीएसटी (व्हिडिओ सर्व्हेलन्स टीम) आणि एसएसटी यांच्या रचना, कार्यपद्धती व जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रम गुरुवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पार पडला.या प्रशिक्षण सत्रात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी, यावर विशेष भर देण्यात आला. एफएसटीमार्फत निवडणूक कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन घटनास्थळी भेट देणे, तपासणी करून आवश्यक ती कारवाई करणे, तसेच त्याबाबतचा अहवाल वेळेत सादर करण्याच्या प्रक्रियेचे सविस्तर मार्गदर्शन आचारसंहिता कक्ष प्रमुख राम लंके यांनी केले.व्हीएसटी (व्हिडिओ सर्व्हेलन्स टीम) बाबत बोलताना निवडणूक प्रचार, सभा, मिरवणुका व अन्य हालचालींचे व्हिडिओ चित्रीकरण करून त्याचे दस्तऐवजीकरण करणे, पुराव्याच्या स्वरूपात व्हिडिओ सामग्री सुरक्षित ठेवणे आणि आवश्यकतेनुसार संबंधित अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्पष्ट करण्यात आली. त्याचप्रमाणे एसएसटी (स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम) मार्फत ठराविक ठिकाणी स्थिरपणे कार्यरत राहून संशयास्पद हालचाली, रोख रक्कम, भेटवस्तू अथवा बेकायदेशीर प्रचार साहित्य यावर लक्ष ठेवून कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आचारसंहिता कक्ष प्रमुख राम लंके यांनी निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने, जबाबदारीने आणि निःपक्षपातीपणे काम करावे, असे आवाहन केले. निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन, वेळेवर अहवाल सादरीकरण आणि नागरिकांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कायम राहील, यासाठी दक्ष राहण्याचे निर्देश त्यांनी दिले.आदर्श आचारसंहितेचा उद्देश : निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील यासाठी आचारसंहितेचे तत्व आणि ती लागू करण्याबाबतचा उद्देश शांततापूर्ण आणि नियमबध्द आचरण, समान संधी, नागरिकांचा शांततेचा अधिकार, प्रचाराकरिता पाळावयाची सभ्यता, निवडणूकी मधील भ्रष्ट आचरण आणि निवडणूक विषयक गुन्हे प्रतिबंधित करणे,

# बालविवाह मुक्त जिल्हा करण्याकरिता नवचैतन्य अभियानाची एक जानेवारी पासून सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती-** बालविवाह ही समाजातील कुप्रथा असून ती समुळ नष्ट होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून बाल विवाह मुक्त अमरावती जिल्हा करण्याकरिता बालविवाह निर्मूलन कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याकरिता नवचैतन्य अभियान एक जानेवारी २०२६ पासून राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी पत्रपरिषदेत दिली.बालविवाह मुक्त जिल्हा करण्याकरिता बाल संरक्षण समिती आयसीडीएस पोलीस शिक्षण आरोग्य विभाग यांच्या सक्रिय सहभागातून प्रतिबंधात्मक संस्थात्मक यंत्रणा मजबूत करण्यात येणार आहे. धार्मिक व सामाजिक नेत्यांना बालविवाह मुक्त गाव आणि प्रभाग घडविण्यासाठी प्रोत्साहित करण्यात




येणार आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत बालविवाह प्रतिबंध अधिनियम२००६ पोहोचविण्यात येणार आहे. बालविवाहाच्या प्रतिबंधासाठी प्रशासन संयुक्तरित्या कार्यक्रम राबविणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी यावेळी दिली.

बाल न्याय अधिनियम २०१५ च्या कलम १६ नुसार प्रत्येक गावात बालकांच्याअधिकारांवर कार्य करण्यासाठी ग्राम बाल संरक्षण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. समितीने प्रत्येक गावात वार्डामध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी आणि शनिवारीबैठक घेणे अनिवार्य आहे व त्याबाबतचा अहवाल तालुकास्तरीय समिती समोर सादर करावा लागेल. या समितीत सरपंचग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील तंटामुक्त समिती बालकल्याण अध्यक्ष समिती मुख्याध्यापक बालरक्षक शिक्षक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी अंगणवाडी सेविका राहणार आहेत.लोकप्रतिनिधी ग्रामपंचायत सदस्य सरपंच यांनाही बालविवाह मुक्त अमरावती करण्याकरिता भूमिका घ्यावी लागेल अन्यथा त्यांच्यावरही अपात्रतेची कारवाई केली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले.२६ जानेवारी २०२६ ला एक विशेष ग्रामसभा घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता मोहोपात्र यांनी दिली.

# शुक्र अस्ताचा परिणाम; डिसेंबर-जानेवारीतील लग्नसराई थंडावली, विवाहेच्छुकांना प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती**

लग्नाची तारीख ठरवलेल्या आणि मुहूर्त पाहणार्या विवाहेच्छुकांना यंदा ग्रहांची साथ लाभलेली नाही. पंचांगकर्त्यांच्या माहितीनुसार दि. १४ डिसेंबर २०२५ ते २९ जानेवारी २०२६ या कालावधीत शुक्र ग्रह अस्त असल्याने या मुख्य काळात एकही शुभ विवाह मुहूर्त उपलब्ध नाही. त्यामुळे परंपरेने गजबजणारी डिसेंबर-जानेवारीतील लग्नसराई यंदा मोठ्या प्रमाणावर थंडावली असून, विवाहसोहळे थेट फेब्रुवारी २०२६ पासूनच पुन्हा जोमात सुरू होणार आहेत.

ज्योतिषशास्त्रानुसार शुक्र हा विवाहाचा प्रमुख कारक ग्रह मानला जातो. शुक्र अस्त असताना विवाह करणे अशुभ समजले जात असल्याने अनेक कुटुंबांना नियोजित लग्नतिथी पुढे ढकलाव्या लागल्या आहेत. परिणामी विवाहेच्छुकांची प्रतीक्षा वाढली असून, वाग्दान झालेल्या जोडप्यांचा ‘विरहकाळ’ही लांबला आहे.

डिसेंबर-जानेवारीत लग्न ठरवलेल्या अनेक कुटुंबांमध्ये सध्या प्रतीक्षेचे वातावरण आहे. लग्न पुढे ढकलल्याने काही ठिकाणी



मानसिक अस्वस्थता व्यक्त होत असून, उपवर-वधूंना विवाहासाठी अधिक काळ वाट पाहावी लागत आहे.

पंचांगानुसार शुक्र अस्त असलेल्या गौणकाळात प्रथम विवाह टाळण्याची परंपरा आहे. मात्र विधवा-विधुर विवाह, पुनर्विवाह किंवा अत्यावश्यक सामाजिक कारण असल्यासच या काळात विवाहास मान्यता दिली जाते. त्यामुळे बहुसंख्य कुटुंबांनी पंचांगातील शुभ मुहूर्तांची प्रतीक्षा करण्याचा निर्णय घेतला असून, फेब्रुवारीपासून लग्नसराई पुन्हा रंगत येणार असल्याचे सांगितले जात आहे.साधारणपणे वर्षाअखेरीस लग्नसराई जोरात असते. मात्र, यंदा मुख्य मुहूर्त नसल्याने मंगल कार्यालये, हॉटेल्स, बँड-बाजा, सजावट व छायाचित्रकार यांच्याही कामावर परिणाम होणार आहे.

### १४ डिसेंबरपासून अस्त

पंचांगानुसार १४ डिसेंबर २०२५ रोजी शुक्र ग्रह अस्तास जात असून, २९ जानेवारी २०२६ पर्यंत हा काळ राहणार आहे. या संपूर्ण कालावधीत मुख्य विवाह मुहूर्त नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### आता फेब्रुवारीतच लग्नयोग

शुक्रोदय झाल्यानंतर फेब्रुवारी २०२६ पासून पुन्हा शुभ विवाह मुहूर्त उपलब्ध तीहोणार आहेत. त्यामुळे फेब्रुवारी ते एप्रिल या काळात लग्नसोहळ्यांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.-

# तपासणी नाका टाळण्यासाठी चालकांचा आडमार्गाचा वापर

## खोमई-शिरसगावच्या अरुंद रस्त्यावरून वाहतूक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९मेळघाट**

परतवाडा ते बैतुल मार्गावर धावणार्या परतवाडा-बैतुल जाणार्या अनेक खाजगी बसेस सध्या स्थानिकांमध्ये चर्चेचा मुद्दा बनला आहे. या बसेसचे परमीट परतवाडा - बैतुल महामार्गापूरतेच मर्यादित असताना गेल्या अनेक दिवसांपासून ह्या बसेस खरपी गावापासून सुमारे ८ किमी अंतरावर असलेल्या तपासणी नाक्याच्या आधीच्याच फाट्यावरून शिरसगाव कसबा - पाळा - खोमई रस्त्यावरून वळविल्याचे निदर्शनास येत आहे. बैतुलवरून वापस येताना ही बस पुन्हा नाका चुकविण्यासाठी तिप्पटमार्गे खोमईवरून शिरसगाव कसबा गाठत असल्याचे स्थानिकांकडून बोलल्या जात आहे.

खोमई-शिरसगाव हा रस्ता अत्यंत अरुंद असून यावरील पूल गेल्या अनेक वर्षांपासून क्षतीग्रस्त अवस्थेत आहे. विशेष म्हणजे, खोमई गावातून बस तुटलेल्या पुलावरून, पर्वताच्या खचलेल्या चढ्या उतारातून कसरत करत काढली जात आहे. प्रवाश्यांना प्रचंड त्रास, भीतीचा सामना करावा लागत आहे.

प्रादेशिक परिवहन विभागाची परमीट, मार्ग व नियमांचे पालन करून घेण्याची जबाबदारी आहे. उल्लंघन होत असल्यास कार्यवाही करणे आवश्यक आहे. बेकायदेशीर मार्गावरून होणारी वाहतूक व प्रवाशांची सुरक्षेची जबाबदारी पोलिसांवर आहे. रस्ते,पु लाचे नियंत्रण हे सा. बां. विभागाकडे आहे.

जर तुटलेला पुलावरून किंवा अरुंद रस्त्यावरून जाताना एखादा गंभीर अपघात झाला तर याची जबाबदारी नेमकी कुणावर येणार? हा प्रश्न सर्वसामान्य विचारत आहे. प्रवाशांचे हाल,जीविताला धोका,नियमांचे सर्रास उल्लंघन होत असताना संबंधित यंत्रणा मौन बाळगून आहेत. प्रशासनाने तात्काळ या प्रकरणाची चौकशी करून तुटलेल्या पुलाची दुरुस्ती होईपर्यंत त्या मार्गावरील जड वाहतूक बंद करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, अमरावती येथे वडिलांनी आपली किडनी देऊन वाचविले मुलीचे प्राण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ६४ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.सदर रुग्ण ही किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही वर्षांपासून डायलिसिस करत होती. तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व तिच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ६४ वे किडनी प्रत्यारोपण, हे ३६ वर्षीय सोनल राजू चौधरी यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण ही अमरावती येथील रहिवासी असुन मागील काही वर्षापासून डायलिसिस चालु होते मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलीच्या पुढील भविष्याचा विचार करून वडील सुरेश रंगराव गुहे (६५वर्ष )यांनी आपली एक किडनी मुलगी सोनल ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी सोनल ला देऊन तिला नवीन जीवन दिले.महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती





येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ विशाल बाहेकर,बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. रमणिका ढोमणे ,डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, आशिष तायडे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के, , विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे,अनु वडे ,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, शुभांगी टिंगणे, आर गवई ,विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे, अनिता गोमकाळे ,आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे,औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, पंकज बेलुरकर,आशिष थुल, गजानन मातकर, अविनाश राठोड, आशिष मिश्रा, शिवा भोंगाळे,रुपेश हरडे,दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

# मेळघाटला आठवडाभरात बालरोग, प्रसुतीतज्ज्ञ द्या : उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

## जनहित याचिकेची पुढील सुनावणी १६ जानेवारीला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मेळघाट**

मुंबई उच्च न्यायालयाने मेळघाटमध्ये माता आणि बालमृत्यू तसेच अंधश्रद्धेच्या घटना रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. न्यायालयाने राज्य सरकारला आठवडाभरात एक बालरोगतज्ज्ञ आणि एक प्रसुतीतज्ज्ञ मेळघाटमध्ये नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत.

पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, 'खोज'चे ड. बंड्या साने आणि इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना गुरुवारी हे आदेश देण्यात आले. न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या द्विसदस्यीय खंडपीठापुढे ही सुनावणी सुरू आहे.

या याचिकेची पुढील सुनावणी १६ जानेवारी रोजी होणार आहे. आजच्या सुनावणीदरम्यान, मुख्य सरकारी वकील भूषण सामंत यांनी राज्य शासनाच्या चार सचिवांनी मेळघाटला भेट देऊन तयार केलेला अहवाल न्यायालयासमोर सादर केला.या अहवालाची प्रत याचिकाकर्त्यांनाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अहवालावर काही मुद्दे मांडायचे असल्यास ते पुढील सुनावणीदरम्यान सादर करावेत, असे न्यायालयाने म्हटले आहे. ड. बंड्या साने यांनी अनेक दिवसांपासून मेळघाटातील समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले आहे.मेळघाटातील परिस्थितीत सुधारणा न झाल्याने ड. साने, पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि 'महान'चे डॉ. आशीष सातव यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या आहेत. न्यायालयाने या सर्व याचिका एकत्रितपणे सुनावणीसाठी घेतल्या आहेत. आजच्या सुनावणीवेळी याचिकाकर्त्यांतर्फे ड. बंड्या साने, ज्येष्ठ विधीज्ञ जुगलकिशोर गिल्डा आणि भूषण माळगावकर यांनी युक्तिवाद केला. सरकारतर्फे आदिवासी विभागाचे प्रधान सचिव ऑनलाइन उपस्थित होते.या याचिकांच्या अनुषंगानेच, गेल्या पंधरवड्यात राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव, एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त आणि आरोग्य विभागाचे प्रधान सचिव यांनी मेळघाटचा प्रत्यक्ष दौरा केला होता. त्यांनी गावोगावच्या आदिवासींची भेट घेऊन वस्तुनिष्ठ अहवाल तयार केला, जो आज न्यायालयात सादर करण्यात आला.

# शेतकरी हिताचे ३ कृषी कायदे परत आणा

## कृषी कार्यकर्त्यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ दर्यापुर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने आणलेले आणि विरोधी पक्षांसह हितसंबंधीयांनी हाणून पाडलेले ३ कृषी सुधारणा कायदे परत आणून लागू करा, अशी मागणी आता देशात जोर धरत आहे. दर्यापूरचे ज्येष्ठ शेतकरी कार्यकर्ते अरविंद नळकांडे यांच्या श्रमराज्य परिषदेच्या वतीने आयोजित विविध सामाजिक, राजकीय संघटनांमधील कृषी कार्यकर्त्यांच्या विचारमंथन बैठकीत ही मागणी करण्यात आली आणि ती पुढे रेटण्याचा निर्धारही करण्यात आला.

विशेष म्हणजे, भारतातील 'स्वदेशी' चळवळीचे पहिले हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मृतिदिनी ही बैठक झाली. याच तिथीला शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची स्थापना करून शेतकरीहिताचा नवीन विचार मांडला होता. देशाच्या लोकसंख्येत अर्ध्यापेक्षा जास्त शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार आहेत. परंतु, जाचक कायदे आणि भ्रष्ट व्यवस्था त्यांना नीट जगू देत नाही. या स्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी मोदींनी ३ सुधारित कृषी कायदे बनवले होते. परंतु, शेतर्यांच्या वेशातील खलिस्तानवाद्यांनी विरोधाच्या नावाखाली दिल्लीत हैदोस घालून आणि त्यांना विरोधी पक्षांनी पाठिंबा देऊन शेजारच्या देशांसारखे अराजक माजविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हे कायदे सरकारला परत घ्यावे लागले, असा संताप व्यक्त करून बैठकीतील कार्यकर्त्यांनी हे कायदे त्वरित लागू करण्याची मागणी केली.

अरविंद नळकांडे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या बैठकीला वनराईचे मधुकर घारड, माजी जिल्हा कृषी अधीक्षक अनिल इंगळे, लोकसंग्राम पक्षाचे दिलीप देशमुख, श्रमराज्यचे प्रदीप इंगळे, भाजपाचे माणिकराव मानकर, फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संजय आसरे, शीतल ठाकूर, भाकपचे रूपराव तिडके, राजेश गावंडे, वंचित बहुजन आघाडीचे अशोक नवलकार, उबाठा शिवसेनेचे किशोर टाले प्रामुख्याने उपस्थित होते.

# देश-विदेशातील हजारो नाण्यांसह नोटांचा संग्रह ठरतेय आकर्षण

## वैष्णव रामकृष्ण ढोमणे यांच्या अनोख्या छंदामुळे विद्यार्थ्यांच्या माहितीत भर, ५ हजाराहून अधिक नाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

हर्षराज कॉलनी परिसरातील संतोषी माता कॉलनी येथील रहिवासी २३ वर्षीय वैष्णव रामकृष्ण ढोमणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून देश-विदेशातील नाणी आणि नोटा संग्रहित करण्याचा एक आगळावेगळा छंद जोपासला आहे. वैष्णव रामकृष्ण ढोमणे हे वारकरी संप्रदायातील शहरातील युवा कीर्तनकार असून सध्या ते डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक अमरावती येथे कनिष्ट लिपीक या पदावर कार्यरत आहेत, तसेच शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे एमएससी पर्यावरण शास्त्र अभ्यासक्रमाचे ते विद्यार्थी आहेत. त्यांचा हा संग्रह सध्या सर्वांचे विशेषत: विद्यार्थ्यांचे आकर्षण ठरत असून यामुळे त्यांच्या माहितीतही भर पडत आहे.



२० पेक्षा जास्त देशांतील ५ हजाराहून अधिक नाणी त्यांच्याकडे आहेत. यात भारतातील २ हजार नाण्यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ५० पेक्षा जास्त देशांतील १०० हून अधिक नोटांचा संग्रहही त्यांच्याकडे आहे. त्यांनी या दुर्मिळ नाण्यांसह नोटा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने फाइल्स आणि बॉक्समध्ये जतन करून ठेवल्या आहेत. त्यामुळे त्या सुरक्षित आहेत.

वैष्णव यांच्या बालपणी त्यांचे पितृछत्र हरवल्यानंतर आई वर्षा ढोमणे व आजी शांता वानखडे यांच्यावर वैष्णव यांच्या जडणघडणीची जबाबदारी येऊन पडली. त्यात आई या प्रशासकीय सेवेमध्ये सहाय्यक लेखापरीक्षण अधिकारी या पदावर नोकरीवर असल्याने त्यांना पूर्णवेळ वैष्णव यांना देणे शक्य होत नसे. अशा वेळी वैष्णव हे तिसऱ्या चौथ्या वर्गात असताना आई, आजी, मामा, मामी, मोठी आई, मोठे वडील, काका, काकू तसेच घरी कुणी पाहुणे म्हणून मोठी माणसे आली की, वैष्णव यांना नाणी, नोटा यांच्या स्वरूपात काही खाऊ म्हणून त्यांच्याकडून मिळायचा. त्या करकरीत चकाकणाऱ्या नोटा, नाणी त्यावरील चित्र याचं कौतुहल तथा आकर्षण वैष्णव यांना वाटायचे. त्या नोटा, नाणी खर्च न करता ते आपल्या संग्रहित ठेवत असत. त्या बरोबर ते खेळत असत. या सर्व प्रकारातून त्यांना नाणी गोळा करण्याची आवड निर्माण झाली.

वैष्णव यांची आई वर्षा ढोमणे, मोठे मामा प्रमोद सदाशिव वानखडे, (सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी ), लहान मामा डॉ.राजेंद्र वानखडे (सहाय्यक प्राध्यापक तसेच वैज्ञानिक प्रादेशिक संशोधन केंद्र अचलपूर) मोठे वडील माजी प्राध्यापक प्रभाकर ढोमणे आणि इतरही कौटुंबिक तथा मित्र वर्गातील सर्व मंडळींनी छंदासाठी त्यांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

वैष्णव यांनी केवळ नाणीच गोळा केली नाहीत, तर त्यांचा इतिहासही समजून घेतला. यासाठी त्यांनी काही इतिहास संशोधकांची मदत घेतली. कारण यात प्राचीन, ऐतिहासिक ते आजवरच्या नाण्यांचा समावेश आहे.वैष्णव यांनी आपल्या या छंदाला केवळ संग्रहापुरते मर्यादित न ठेवता, ऐतिहासिक माहिती आणि शिस्तबद्ध मांडणीच्या जोरावर एका मोठ्या ठेव्याचे स्वरूप दिले आहे. त्यांनी संग्रहित केलेल्या सर्व देश-विदेशातील हजारो नाणी आणि नोटा यांच्या संग्रहाचे प्रदर्शन अमरावतीकरांसाठी लवकरच भरवले जाईल. जेणेकरून अमरावतीकरांना या सर्व नाणी आणि नोटांचे पाहणी करता येईल. या प्रदर्शनीचा आनंद घेता येईल.

# अखेर संत्रा फळपिक विम्याचे १७ कोटी रुपये संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

## रुपेश वाळके यांनी मानले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मोर्शी**

हवामानावर आधारित संत्रा फळ पिक विमा योजना २०२४ २०२५ चा आंबिया बहार संत्रा फळ पिक विम्याचा परतावा रब्बी हंगाम संपल्यावर ४५ दिवसांत जाहीर करणे क्रमप्राप्त असतांना हंगाम संपून ७ महिने लोटले तरीही ट्रिगर लागू नसल्याचे कारण देत विमा कंपनीने परतावा नाकारला होता. मात्र माजी आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी यशस्वी पाठपुरावा केल्यानंतर विमा कंपनीने अखेर ट्रिगर मान्य केले. आमच्या आंदोलनाची दखल घेतल्यामुळे फळ पिक विम्याचा लाभ अमरावती जिल्ह्यातील ३०१५ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मिळाला असून शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण १७ कोटी २६ लाख ८८ हजार ११० रुपयांचा परतावा जमा झाला असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी सांगितले.अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी आधीच संकटात असून शासनाच्या व विमा कंपनीच्या जुलमी धोरणामुळे संत्रा उत्पादक शेतकरी हतबल झाला असतांना हवमानवर आधारित संत्रा फळ पिक विमा योजनेचे १७ कोटी रुपये विमा कंपनी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना देण्यास विविध जाचक अटी समोर करून विमा परतवा देण्यास टाळाटाळ करीत होती. अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्याया विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी लढा उभारून शासनाकडे व विमा कंपनीकडे यशस्वी पाठपुरावा करून मोर्शी येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयामध्ये तब्बल ६ तास ठिय्या आनोदलन करून शासनाचे व विमा कंपनीचे लक्ष वेधून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पिक विमा परतावा तत्काळ वाटप करण्यात यावा अशी मागणी रेटून धरली होती. रुपेश वाळके यांच्या नेतृत्वात १४ डिसेंबर रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये होणाऱ्या आंदोलनाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी १३ डिसेंबर रोजी सदर विमा कंपनीला संत्रा फळ पिक विमा योजनेचे पैसे वाटप करण्याचे निर्देश दिल्यामुळे १३ डिसेंबर पासून हवामानवर आधारित संत्रा फळ पीक विमा योजनेअंतर्गत संपूर्ण माहिती प्रधानमंत्री पीक विमा पोर्टलवर चढविण्याचे काम जलदगतीने पूर्ण करण्यात आले होते. त्यानंतर १६ डिसेंबर पासून जिल्ह्यातील ३०१५ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १७ कोटी २६ लाख ८८ हजार ११० रुपये रक्कम थेट डीबीटी प्रणालीद्वारे जमा करण्यात आले आहे. तसे संदेश शेतकऱ्यांच्या भ्रमणध्वनीवर आले असल्यामुळे माजी आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी शासन व विमा कंपनी विरोधात लढा उभारून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळून दिल्याबद्दल अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# मनपा निवडणुकीसाठी युवा स्वाभिमान पार्टीकडून उमेदवार मुलाखतींना प्रारंभ

## पहिल्याच दिवशी १२३ इच्छुकांची मुलाखत राजापेठ कार्यालयात कार्यकर्त्यांची गर्दी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

येत्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पार्टीकडून उमेदवार निवड प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली असून, राजापेठ येथील पक्षाच्या मुख्य कार्यालयात पहिल्या दिवशी तब्बल १२३ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती निवडणूक मुलाखत समितीकडून घेण्यात आल्या. या प्रक्रियेमुळे पक्ष कार्यालयात इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

मुलाखतीदरम्यान उमेदवारांचा सामाजिक कार्याचा अनुभव, पक्षाशी असलेली निष्ठा, जनसंपर्क, स्थानिक प्रश्नांची जाण तसेच निवडणूक जिंकण्याची क्षमता या विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. पक्ष संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने ही उमेदवार निवड प्रक्रिया पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे पक्ष नेतृत्वाकडून सांगण्यात आले.

या मुलाखती राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. यावेळी मार्गदर्शक सुनीलजी राणा यांच्यासह समिती सदस्य प्रा. अजयजी गाडे, नंदेशजी अंबाडकर, शैलेंद्रजी कस्तुरे, जयंतराव वानखडे, हरिषजी चरपे, कमलकिशोरजी मालानी, शिवदासजी घुले, संजय हिंगासपुरे, सोनाली नवले, ज्योती सैरिसे, संजय मुनोत, मनोज चांदवानी, प्रा. सतीश खोडे, प्रा. संतोष बनसोड, गंगाधर आवारे आणि बाळु इंगोले उपस्थित होते.

पक्षाच्या ध्येयधोरणांशी प्रामाणिक राहून सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या कार्यक्षम उमेदवारांना संधी देण्याचा मानस नेतृत्वाने व्यक्त केला. येत्या काही दिवसांत उर्वरित उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार असून, त्यानंतर कोअर कमेटी अंतिम निर्णय घेऊन अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करणार असल्याची माहिती देण्यात आली.

# मतदानासाठी पथके मतदान साहित्यांसह रवाना; प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज....



अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी येथील नगरपरिषद अध्यक्ष आणि इतर नगरपालिका, नगरपंचायत मधील आठ जागांवर सदस्यपदासाठी उद्याला मतदान घेण्यात येणार आहे. या करिता आज मतदान केंद्रासाठी ईव्हीएम मशीन व मतदानासाठी लागणारे आवश्यक साहित्य, साधनसामुग्री घेऊन मतदान पथके मतदानस्थळी रवाना झाली आहेत.

# मनपा निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाला मोठा धक्का

## २५ वर्ष नगरसेवक राहिलेले ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते प्रशांत वानखडे यांचा युवा स्वाभिमान संघटनेत प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर अमरावतीत ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का बसला असून, सलग २५ वर्ष अमरावती महानगरपालिकेत नगरसेवक राहिलेले ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते प्रशांत वानखडे यांनी युवा स्वाभिमान संघटनेत जाहीर पक्षप्रवेश केला. हा पक्षप्रवेश आमदार रवी राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

प्रशांत वानखडे हे अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासातील सर्वाधिक काळ नगरसेवक राहिलेले ठाकरे गटाचे नेते मानले जातात. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे आगामी मनपा निवडणुकीत ठाकरे गटाला मोठा धक्का बसल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. विशेषतः निवडणुकीच्या तोंडावर घडलेल्या या घडामोडीमुळे ठाकरे गटाची संघटनात्मक ताकद कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पक्षप्रवेशावेळी आमदार रवी राणा यांनी ठाकरे गटावर जोरदार टीका करत, अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाला सुरुंग लावण्याचे काम युवा स्वाभिमान संघटना करेल, असा स्पष्ट इशारा दिला. युवा स्वाभिमान संघटना शहरातील सर्व प्रभागांमध्ये ताकदीने मैदानात उतरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पक्षप्रवेशानंतर प्रतिक्रिया देताना प्रशांत वानखडे म्हणाले की, ठाकरे गट पूर्णपणे नेतृत्वहीन झाला आहे. कार्यकर्त्यांसाठी कोणतेही ठोस नेतृत्व राहिलेले नाही. त्यामुळे सामान्य जनतेसाठी काम करणाऱ्या युवा स्वाभिमान संघटनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आमदार रवी राणा यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.या पक्षप्रवेशामुळे अमरावतीतील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून, महानगरपालिका निवडणूक अधिकच रंगतदार होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. युवा स्वाभिमान संघटनेची ताकद या प्रवेशामुळे वाढली असून, ठाकरे गटासाठी ही घडामोड मोठा धक्का मानली जात आहे.

# सीपी ओला ऑन रोड, ट्रॅफिक व्यवस्थेचा घेतला आढावा

## स्थानिक व्यापारी - ग्राहकांच्या समस्या जाणून घेतल्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

अमरावतीः शहराच्या मुख्य बाजारपेठेत अनेक दिवसांपासून वाहतुकीची समस्या आहे. या अनुषंगाने नवनियुक्त पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील सर्व पोलिस स्टेशन परीसरातील विविध भागांचा आढोवा घेण्यास सुरुवात केली आहे. गुरुवारी संध्याकाळी सीपी राकेश ओला यांनी स्वतः ऑन रोड शहरातील वाहतुकीचा आढावा घेतला. त्यांनी मुख्य बाजारपेठेतील व्यापाऱ्यांच्या आणि ग्राहकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी वाहतूक पोलिस आणि पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना दिशानिर्देश देत मार्गदर्शन केले.गुरुवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पोलिस आयुक्त राकेश ओला अचानक शहरातील मुख्य बाजारपेठेतील श्याम चौकात पोहोचले. तेथून ते चित्रा चौक, टांगापाडव चौक आणि सरोज चौकातून पायदळ चालत जयस्तंभ चौकात पोहोचत वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेतला.राजकमल रेल्वे उड्डाणपूल बंद असल्याने गेल्या काही महिन्यांपासून दररोज विविध वाहतूक समस्या निर्माण होत आहेत.विशेषतः सणांच्या काळात रस्त्यांवर वाहतूककोंडी होते. वाहतूक व्यवस्थाकशी सुरळीत करता येईल, याबाबत सीपी ओला यांनी चर्चा केली. त्यानंतर सीपींनी सिटी कोतवाली पोलिस स्टेशनमध्ये पोहोचून कामकाजाचा आढावा घेतला.

**पार्किंग, नो पार्किंग समस्या**

वाहतूक विभाग नियमितपणे नो पार्किंगविरुद्ध कारवाई करत असला तरी, शहरातील बहुतेक भागात पार्किंग सुविधा नसल्याने वर्षानुवर्षे परिस्थिती तशीच आहे. शिवाय, वाहतूक विभागाच्या कृतींबद्दल नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.राजकमल, राजापेठ दरम्यान उड्डाण -पुलाखाली त्यांची वाहने पार्क करत असत. परंतु गेल्या दोन वर्षांपासून, भटक्यांनी बहुतेक भागात वास्तव्य केले आहे. ते रस्त्यावर हंगामा करतात.अश्या अनेक समस्या नागरिकांनी पोलिस आयुक्तांकडे मांडल्यात.

# महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

## चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चेनंतर निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर केलेली निलंबनाची कारवाई ३ दिवसात मागे घेतली. यासह इतर मुद्यांवरही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दाखविलेल्या सकारात्मक भूमिकेवर समाधान व्यक्त करत महसूल यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारपासून पुकारलेला संप मागे घेण्याचा निर्णय घेतला.



मुंबई मंत्रालयातील महसूलमंत्र्यांच्या दालनात राज्यातील विविध महसूल संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत एकूण १३ मुद्यांवर जवळपास ३ तास सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील प्रकरणात निलंबित अधिकारी कर्मचाऱ्यांचे निलंबन तीन दिवसात मागे घेणार, त्यासाठी विभागीय आयुक्तांकडून तात्काळ अहवाल मागिवणार, पालघरमधील कर्मचाऱ्याचे निलंबन तात्काळ मागे घेण्यातयेईल, असे आश्वासन देण्यात आले. यासोबतच विविध मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्यात आली.

बैठकीला महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघ या मुख्य महासंघाशी जोडलेल्या महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटना, महाराष्ट्र राज्य तलाठी संघटना, विदर्भ पटवारी संघ (नागपूर-२), विदर्भ (राजस्व निरीक्षक) मंडळ अधिकारी संघ, नागपूर, विदर्भ कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळाधिकारी समन्वय महासंघ, महाराष्ट्र राज्य महसूलसेवक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महसूलमंत्र्यांनी दिलेले आश्वासन व विविध विषयाबाबत सकारात्मक भूमिका याबाबत शुक्रवारपासून पुकारण्यात आलेले राज्यव्यापी आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात येत असल्याचे महसूल संघटनांनी जाहीर केले आहे.

**महसूल विभागाचा लवकरच नवा आकृतीबंध**

महसूल विभागाचा लवकरच नवा आकृतीबंध, ग्रेड-पेबाबत शासन सकारात्मक असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे तलाठी संवर्गातून परीक्षेच्या माध्यमातून नायब तहसीलदारांची पदे भरण्यासही त्यांनी होणार दर्शविला. आंदोलन काळातील पगार न कापण्यासही सकारात्मकता दर्शविण्यात आली. महसूल आणि भूमी अभिलेख विभागाचा नवीन 'आकृतीबंध' तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यात संघटनांच्या सूचना विचारात घेतल्या जातील, असेही बैठकीत ठरले.

# उमेदवारांना प्रचारासाठी मिळणार केवळ ११ दिवस

## राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचारासाठी सज्ज

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी निश्चित झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रचारासाठी उमेदवारांना केवळ ११ दिवसांचा कालावधी मिळणार आहे. एका प्रभागात तब्बल १५ ते २५ हजार मतदारसंख्या असताना इतक्या कमी वेळेत मतदारांपर्यंत पोहोचणे हेच मोठे आव्हान उमेदवारांना ठरणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांसह सर्वच राजकीय पक्षांची धावपळ सुरू झाली आहे.उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारपासून (दि.२३) सुरू होणार असून, त्याआधीच संभाव्य उमेदवारांनी तयारीला वेग दिला जात आहे. तिकीट मिळताच प्रचार सुरू करता यावा, यासाठी प्रभागनिहाय संपर्क यादी, बूथनिहाय कार्यकर्ते, गाठीभेटींचे नियोजन आणि प्रचार साहित्याची पूर्वतयारी केली जात आहे. विशेषतः कमी कालावधीत पक्षाचे चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना करण्यात येत आहे.मोठ्या प्रभागात प्रत्यक्ष घराघरात पोहोचण्यासाठी वेळ अपुरा असल्याने प्रचाराच्या पद्धतींमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. पदयात्रा, कोपरा /सभा, छोट्या बैठका, सोशल मीडियाचा प्रभावी वापर, मोबाइल प्रचार वाहनांद्वारे प्रचार यावर भर दिला जाणार आहे. अनेक पक्षांनी आधीच अनौपचारिक जनसंपर्क सुरू ठेवला आहे.

**उमेदवारांची कसोटी**

कमी कालावधीत मतदारांशी थेट संवाद साधणे, स्थानिक प्रश्नांवर स्वतःची आणि पक्षाची भूमिका स्पष्ट करणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. इच्छुक उमेदवारांची नाराजी, तिकीट वाटपातील गणिते आणि मर्यादित प्रचार कालावधी या सगळ्यांचा सामना करताना राजकीय पक्षांची रणनीती किती प्रभावी ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवारी जाहीर होताच प्रचाराला पूर्ण ताकदीने सुरुवात करण्याची तयारी अनेकांनी केली आहे.

**प्रचारासाठी सज्ज**

निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचारासाठी सज्ज असून अनेकांनी आपआपल्या उमेदवारांचे नाव समोर करणे सुरु केले.

# विनापरवाना जाहिरात फलक आचारसंहिताभंगाचा होणार गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**




महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने शहरातील रस्त्यांवर आणि चौकांमध्ये जाहिरात फलक काढण्यास सुरुवात झाली आहे. आता यापुढे जाहिरात फलक लावताना महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे महापालिकेची परवानगी न घेता जाहिरात फलक लावणाऱ्या इच्छुकांवर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करून दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

या जाहिरात फलकांवर ज्या राजकीय पक्षांचे संबंधित इच्छुक असतील, त्याचा खर्च राजकीय पक्षाच्या खर्चात दाखविण्यात येणार आहे.महापालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे महापालिकेने शहरातील विविध भागांत राजकीय पक्षांच्या इच्छुकांकडून लावण्यात आलेले जाहिरात फलक काढून टाकण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेची निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जात आहे.निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार महापालिकेने नियोजन केले आहे. शहरातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी जाहिरात फलक लावले होते.

**तक्रार निवारण कक्ष**

महापालिकेच्या निवडणुकीत आचारसंहितेचा भंग होऊ नये, यासाठी निवडणूक संनियंत्रित समिती, भरारी पथके, तक्रार निवारण कक्ष, निवडणुकीच्या काळात घडणाऱ्या महत्त्वाच्या घटना, प्रचार फेऱ्या, नेत्यांच्या सभा, अवाजवी खर्च यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व्हिडीओ चित्रीकरण पथक तयार केले जाणार आहे. तसेच त्यावर कार्यवाही करण्यासाठी विशेष कक्षदेखील स्थापन केला जाणार आहे. आचारसंहिता भंगाची तक्रार स्वीकारूनत्यावर कार्यवाही करण्यासाठी विशेष कक्ष देखील स्थापन करण्यात येणार आहे.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या बदलीसाठी ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ग्रामपंचायत वरूड खुर्द येथे कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी सतीश किसनराव गवई यांच्या कामकाजाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सदर अधिकारी हे अकर्मक्षम असून त्यांच्या कामकाजाबाबत निष्काळजीपणा दाखवत असल्याने ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या संदर्भात ग्रामपंचायत वरूड खुर्द पदाधिकारी यांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि प अमरावती, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, तहसीलदार, पोलीस स्टेशन तसेच लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे गावातील अनेक कामे प्रलंबित असून याबाबत वारंवार गट विकास अधिकारी यांना तोंडी व लेखी तक्रारी करूनही कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही.प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे अखेर ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून सोमवार दि. २२ पासून पंचायत समिती अंजनगावसुर्जी परिसर येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या उपोषणात सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.वेळीच दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला असून, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे.

# वरूडचा चंदन हरले भारतीय सैन्यात लेफ्टनंट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वरुड**

सामान्य कुटुंबातून आलेल्या चंदनच्या या यशामागे अथक परिश्रम, जिद्द आणि देशसेवेचे स्वप्न दडलेले आहे. चंदन हरले यांच्या आईचे नाव पुष्पा हरले, बहीण अश्विनी ही सॉफ्टवेअर इंजिनियर असून ती हैदराबाद येथे ॲमेझॉन कंपनीमध्ये कार्यरत आहे. चंदनने इयत्ता अकरावी व बारावीचे शिक्षण घेत असताना सन २०१९-२० मध्ये कोल्हापूर येथे स्पर्धा परीक्षेचे क्लासेस केले. त्यानंतर त्याने नॅशनल डिफेन्स अकॅडमीची परीक्षा दिली. या परीक्षेत तो उत्तीर्ण झाला आणि पुढे बंगळुरू येथे सेवा निवड मंडळाची मुलाखत दिली. या कठीण मुलाखतीतही यश प्राप्त केले. त्यानंतर झालेल्या वैद्यकीय तपासणीत चंदनची निवड झाली.



देशभरातील हजारो उमेदवारांमधून केवळ साडेतीनशे विद्यार्थ्यांमध्ये त्यांची निवड झाली आणि अधिकृतपणे एनडीएत प्रवेश केला. चंदनने फेब्रुवारी २०२२ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत खडकवासला, पुणे येथे एनडीएचे कठोर व शिस्तबद्ध प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यानंतर त्याने इंडियन मिलिटरी अॅकॅडमी, डेहराडून येथे एका वर्षाचे पुढील प्रशिक्षण घेतले. १३ डिसेंबर रोजी चंदन आयएमएमधून पास आऊट झाले आणि अधिकृतपणे भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदावर रुजू झाले. त्यांची पहिली पोस्टिंग पश्चिम बंगालमधील सिलिगुडी येथे झाली. चंदन हरले म्हणाले, देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून मी सातत्याने मेहनत घेतली. कुटुंबाचा पाठिंबा, गुरुजनांचे मार्गदर्शन आणि स्वतःवरील विश्वासामुळे यश मिळू शकले. चंदनच्या या उल्लेखनीय यशामुळे वरूड तालुक्यात आनंदाचे वातावरण असून युवकांसाठी त्यांचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

# संत गाडगे बाबा राष्ट्रीय सन्मान पुरस्कार २०२५ जाहिर

## जीवन गौरव पुरस्काराने जनार्दनपंत बोथे गुरुजी होणार सन्मानित

### सेवा सन्मान करीता संजय ठाकरे, कीरण पातुरकर, कैलाश गिरोळकर, अतुल कोल्हे, सुशील दत्त बागडे प्रा हरीदास खुळे, मिलींद मानकर, अंरवीद परदेशी, गोपाल ईंगळे, सौ. वर्षाताई शिंगणे यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

शब्दप्रभु मासिक व जन कल्यान फाऊंडेशन अमरावती व आयोजन समीती चा वतीनें आयोजीत संत गाडगे बाबा यांच्या ६९व्या पुण्यतिथी निमित्य दिंनाक २० डिंसेबर २०२५ला भगवान् मुंगसाजी माऊली दरबार सभागृहात चैतन्य कालनी अमरावती येथे दुपारी ३ वाजता संत गाडगे राष्ट्रीय सन्मान पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, आयोजन समीती अध्यक्ष दिपक गिरोळकर सचीव-गोपाल उताणे यांनी एका पत्रका व्दारे अखिल भारतीय गुरुदेव समीती सरचिटणीस मा श्री जनार्दनपंत बोथे गुरुजी यांना संत गाडगे बाबा स्मुती राष्ट्रीय जीवन गौरव सेवा सन्मान पुरस्कार २०२५ जाहिर करण्यात आला आहे, तर संत गाडगे बाबा स्मुती राष्ट्रीय सन्मान पुरस्कार २०२५ करीता आकाशवाणीचे मुख्य निवेदक संजय ठाकरे साहेब, स्वयंसिध्द अभियान चे अध्यक्ष किरण पातुरकर, कैलाश छाया ट्रस्ट्रचे अध्यक्ष कैलाश गिरोळकर, नाट्यकर्मी सुशील दत्त बागडे, रोटरी चे अतुल कोल्हे, प्रा हरीदास खुळे सर, मिंलीद मानकर सचीव - भगवान् मुंगसाजी माऊली बहुउदेदशीय संस्था, पतंजलि चे अरंवीद परदेशी, धम्म प्रचार




समीती सचीव गोपाल ईंगळे, सावली बँक चा सौ. वर्षाताई शिंगणे यांची निवड करण्यात आली आहे. या सोहळ्याचा अध्यक्ष स्थानी अच्युत महाराज हार्ट हास्पिटल चे विश्वस्त संत सचीन देव महाराज कुपया शिष्य संत अच्युत महाराज, प्रमुख पाहुणे डॉ नितीन धांडे, अध्यक्ष विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती, संत डॉ संतोश देवजी महाराज, सुभाष पावडे अध्यक्ष श्री कुष्ण मंदिर देवस्थान माता खिड़की, माजी उपमहापौर चेतन पवार, रुपम सुर्यवंशी, अन्नपूर्णा सौ. रुपाली जीतेंद्र सगणे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. आयोजन समीती अध्यक्ष दिपक गिरोळकर अध्यक्ष जन कल्यान फाऊंडेशन अमरावती, आयोजन समीती सचीव गोपाल उताणे संपादक शब्दप्रभु मासिक अमरावती, निंमत्रक सौ. मंजुषा उताणे, सयोंजीका सौ. योगीता बोंडे, सौ. वनीता गिरोळकर, आयोजन समीती सदस्य जुगल किशोर गट्टानी, लक्ष्मनराव ढवळे, दादा साहेब टोपले, गजानन सोनोने, अविनाश वाटाणे, डॉ गुणवत डहाणे, रंगरावजी कडु महाराज, भोलेश्वर मुदगल, अमोल चवणे, विलास साखरे, सौ. सवीता सायर, सौ हर्षा सगणे, निकीता गांवडे, सौ. छायाताई गिरोळकर, सौ. रेखाताई गिरोळकर, सौ. रोषणी गिरोळकर, सौ. कविता चांदेकर, सौ. अंजली पडोळे, सौ. ज्योती देवताळे, श्रीमती गिता ठाकुर, कृष्णाई गिरोळकर व कोमल उताणे या आयोजन समितीच्या वतीने कार्यक्रमाला उपस्थितीत राहण्याची विनंती केली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत